
१०६८
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
अ. क्र. ९३२८

शिल्पकार

मिति

# यमजी शिंदे



REFBK-0013820

केदार
प्रकाशन

वा.न. शिरवा

૧૩૬૨૦

૩૦૪૭૮ -
ગ્રં. ૩૧૫
૨૩/૭/૬૨

૫૩૨૮

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .......... वि: ..................
क्रमांक ........................ नों दि ..............

महाराष्ट्राचे शिल्पकार : ३ :

समाज-सुधारक



# कर्ममूर्ति विठ्ठलराव शिंदे

लेखक : दामोदर नरहर शिखरे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. 92.(20

केदार प्रकाशन, पुणे २.

मूल्य : १-५०

REFBK-0013820

प्रकाशक

सौ. सुनीति दुबळे

केदार प्रकाशन

थोरले बाजीराव रस्ता, पुणे २

■

सर्व प्रकारचे हक्क

प्रकाशकाचे स्वाधीन

■

आवृत्ति १ ली

गणेश चतुर्थी ६४

■

चित्रकार

दत्ता महाबळेश्वरकर

मुद्रक

छ. ते. लोधी

सहकार मुद्रणालय

५४० गणेश पेठ, पुणे २

■

# लेखकाची भूमिका

नव्या विशाल महाराष्ट्रानें, आपल्या भावी उत्कर्षांसाठीं, जुन्या महाराष्ट्राची ओळख करून घेणें आवश्य आहे. ज्ञानी व त्यागी, कर्तृत्वसंपन्न व चारित्र्य-संपन्न, ध्येयवादी व सेवाव्रती–अशा नररत्नांची खाण म्हणजे महाराष्ट्र ! आतां त्याच्या आकांक्षा नवीन, प्रयत्न नवीन, आणि कार्यांचीं क्षेत्रें व क्षितिजेंहि नवीन. तरीहि गेल्या शें–सव्वाशें वर्षांत ज्यांनी ज्यांनीं महाराष्ट्राची घडण नाना अंगांनीं केली, त्या नररत्नांचे वरील गुण, नाविन्यानें नटलेल्या व चैतन्यानें स्फुरणाऱ्या महाराष्ट्रानें, आत्मसात् करणें हितप्रद ठरेल.

अशा 'महाराष्ट्राच्या शिल्पकारां'चीं स्फूर्तिदायक चरित्रें गुंफण्याचा माझा संकल्प आहे. त्या चरित्र–मालेंतील समाजसुधारक विभागापैकीं हें तिसरें पुस्तक. हेंहि पुस्तक विद्यार्थी–वर्गास आकर्षक वाटेल, आणि तें वाचतां वाचतां त्यांच्या अंतःकरणावर शुभ–संस्कार घडतील, असा मला विश्वास वाटतो.

महात्मा मासिक, नातूबाग, पुणें २
गणेश चतुर्थी, १९६४

दा. न. शिखरे

# अनुक्रम

| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | गरीबींतील गोडी | ५ |
| २ | टाकीचे घाव | १२ |
| ३ | विलायतची वारी | २८ |
| ४ | भारतभर प्रचार | ४१ |
| ५ | दलितांची सेवा | ५५ |
| ६ | सेवेचे बीज | ६४ |
| ७ | राष्ट्रीयत्वाचा बाणा | ७६ |
| ८ | स्वभावाचे पैलू | ८२ |

■



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 93630

# एक

आईच्या प्रेमाला सीमा नसते आणि तिला श्रमाची तमा नसते; हा तिचा महिमा कोण नाकारील? पण यमुनाबाई म्हणजे फार थोर आई. तिनें गरिबीची पर्वा केली नाहीं आणि कष्टांत कधीं कसूर केली नाहीं. आपल्या मायेच्या सावलीखालीं आणि धर्मप्रेमाच्या अभिषेकाखालीं तिनें आपलीं पिलें संभाळलीं नि वाढविलीं. त्यांतहि विठ्ठलावर तिची ममता विशेषच.

'विठू, वासे आण' म्हणून आईनें सांगण्याचा अवकाश कीं एका हातानें शेंडी व दुसऱ्या हातानें लंगोटीचें शेपूट ओढीत विठ्ठल वासे ओढायला धावलाच! आई सैंपाकाला बसलेली; पण सैंपाक कशाचा करायचा? कशावर करायचा? रुपयाला १६ पायली धान्य मिळे—

एका पैशाला एक शेर ज्वारी मिळे—पण ती घ्यायला तरी तांबडा पैसा कुठं आहे? आणि भाकरीबरोबर भाजी? निदान मीठ? शेजाऱ्यापाजाऱ्याकडून तेंहि एकवेळ आणलें, तरी चूल पेटवायला लांकडें कुठं आहेत? त्यासाठीं यमुनाबाई आपल्या विठ्ठलाचा धावा करीत. तो ऐकतांच विठ्ठल धांवून येई आणि आपल्या जुन्या वाड्याच्या अंगणांत ज्या झोपडया गोरगरिबांसाठीं होत्या, त्यांचे वासे ओढून आणी. तेंच जळण घेऊन यमुनाबाई सैंपाक करीत.

आणि एकादे वेळीं तेंहि जळण नसलें, उसनें धान्यहि नसलें; तर मग?

मोलकरीण वाळूबाई कोठून तरी भाकरीचे तुकडे आणून देई—फार दिवसांचे, शिळे, वाळलेले, कोरडे तुकडे—लाकडासारखे कडक झालेले तुकडे! ते ताकांत बुचकळून विठ्ठल खाई—त्याचीं भावंडेंहि खात. अन् ताकहि नसलें, तर? शुद्ध पाण्यांत भिजवून तीं पोरें तीं खात! त्या पाण्यांत आपल्या आईच्या डोळ्यांतील किती पाणी मिसळलें आहे, याची त्या बछडयांना काय कल्पना! पक्वान्न समजून त्यांनीं ती भाकरी खावी—अन् पुढें किती तरी वेळ नुसतीं बोटेंच चाटीत बसावें! अमृताची गोडी त्या बाळगोपाळांना त्यांत वाटे!

पेवांत पुष्कळ दिवस सांठविलेलें जोंधळें स्वस्त! म्हणून यमुनाबाई तेच विकत आणी. त्यांना कुबट वास येई. पण त्याच जोंधळ्याची भाकरी, तसल्याच तुरीच्या डाळीचें वरण आणि तांबडया मिरच्यांची

चटणी–बस्स् ! हे तीनच पदार्थ–पण पंचपक्वान्नाप्रमाणें विठोबाला नि त्याच्या भावाबहिणींना मधुर लागत.

आणि त्यांत मिसळे माधुरी मातेच्या मुखांतून निघणाऱ्या गोष्टींची नि गाण्यांची. मग काय ? बासुंदीपुरीचाच बेत ! त्या गोष्टी नि तीं गाणीं ऐकतांना, मुलांना वेळेचें भान कोठलें ? जेवण आटोपले नि हात वाळले; तरी ती आपल्या आईच्या तोंडाकडे पहातच रहावयाचीं. त्या गोष्टी नि तीं गाणीं हाच त्यांचा गोड मेवा–थोर ठेवा ! तिची आनंदी नि विनोदी वृत्ति हीच त्यांची विश्रांति !

एकादे वेळीं काय होई ? तिन्हीसांजा झाल्या म्हणजे खेळून खेळून मुलांना भुका फार लागलेल्या असायच्या. पण सैंपाकाला अवकाश असायचा. तेंव्हां मुलें चुलीजवळ गोळा होत अन् 'गोष्ट सांग ना ग आई, गोष्ट सांग' असा गोड हट्ट धरीत.

आईच ती ! पोटांतली आग पोटांत लपवी नि तोंडावर हसूं आणून, कधीं रामाच्या तर कधीं कृष्णाच्या, कधीं शबरीच्या बोरांच्या तर कधीं सुदाम्याच्या पोह्यांच्या, प्रेमळ गोष्टी प्रेमळ स्वरांत सांगूं लागे. त्या ऐकतांना मुलें इतकीं तल्लीन होत कीं, सैंपाक केव्हां झाला अन् थाळींत भाकर केव्हां पडली याचें भानहि त्यांना नसे. भराभर जेवण उरकलें, तरी आपण काय खाल्लें–कां मुळींच कांहीं खाल्लें नाहीं–हेंहि त्यांच्या गांवीं नसे. सारें ध्यान आईच्या गोष्टीकडे. गोष्टींच्या मेजवानींतच त्यांचें मन गुंग; आईचे बोल ऐकण्यांतच त्यांचें हृदय दंग ! आईच त्यांची खेळगडी ! !

आणि वडील मोठे विठ्ठलभक्त—त्यांनीं आपल्या वाड्याजवळ विठोबाचें एक लहानसें देऊळ बांधलें होतें. ते त्याला 'विठोबाचा मठ' म्हणत. तेथें ते भजन-पूजन करीत. तुकोबापासून एकनाथांच्या पुण्यतिथीपर्यंत त्या मठांत भजनाचा सप्ताह दरवर्षी साजरा केला जाई. सात दिवस अहोरात्र वीणा वाजत राही आणि ज्ञानोबा-तुकोबा-एकोबांचे अभंग गाईले जात. सकाळीं व संध्याकाळीं कांकड-आरती व शेजारती होत असे. ३०-४० टाळकरी भजनास असत, त्यांत विठ्ठल व त्याचा भाऊ असे. त्यांमुळें भजनास् मोठा रंग येई, आणि शेवटीं आरतीचा थाट तर कांहीं विलक्षणच! आरती धरण्याचा मान रामजी बाबांचा. त्या वेळीं गुलाल उधळला जाई—बुक्का, उदबत्त्या, कापूर यांचा घमघमाट सुटे आणि शेवटी खिरापत. स्त्री-पुरुष, श्रोते खिरापतीचीं ताटें आपल्या घरून भरभरून आणीत. त्यानंतर असे प्रसाद—म्हणजे जेवण. शें-दोनशें पात्र होई. त्यांत साऱ्या जातींचे लोक येत. शेवटच्या दिवशीं महाप्रसाद आणि नंतर दिंडीचा छबिना. तो सर्व रात्रभर गांवांतून वाजतगाजत फिरे.

वारकरी संप्रदायाचा रामजींच्या मनावर फार परिणाम झालेला होता. ते मांसाहाराला स्पर्श करीत नसत. सारें, कुटुंब शाकाहारी. अपवाद फक्त विठोबाच्या आजोबांचा. ते देवीला मेंढीचा नैवेद्य करीत. त्यांना कधीं मांस खावयाचें झाल्यास गोठ्यांत निराळा स्वयंपाक करावा लागे आणि तेथें जेवण केल्यावर सारीं भांडीं स्वतः घांसून घरीं यावें लागे. पण वडील शाकाहारी. त्यांची राहाणी शुद्ध ब्राह्मणी. एका शास्त्रीबुवाजवळ ते लिहा-वाचायला शिकले. ते हिशेब उत्तम ठेवीत.

जमखंडी संस्थानच्या दरबारांत जमाखर्चामध्यें त्यांचा हात धरणारा कोणी नव्हता. त्यांचें मोडी अक्षर म्हणजे मोत्यांचे दाणे. त्यांना संस्थानांत प्रथम शिक्षकाची नोकरी होती, पण पुढें ते कारकुनी करूं लागले. त्यांनीं प्राकृत-पोथ्यांचें पारायण तर केलेंच होतें, पण त्याशिवाय धर्मशास्त्र, ज्योतिषशास्त्र, वैद्यकशास्त्र वगैरे विषयांचेंहि ज्ञान त्यांना होतें. शेतकरी किंवा शिलेदारी बाणा त्यांच्यांत नव्हता. बुद्धिजीवी मध्यमवर्गांत ते मिसळले होते. मराठी, कानडी व उर्दू या भाषा सफाईनें बोलत.

स्वभावानें रामजीबाबा कोंवळ्या अंतःकरणाचे होते, पण त्यांना चट्कन राग येई. त्या रागाच्या भरांत ते मुलांना बेफाम मारीत. पण राग ओसरल्यावर स्वतः अश्रु गाळीत. फार काय, गांवच्या पोलिसांनीं कांहीं चूक केली तर त्यांनाहि ते मारीत.

रामजीबाबा जसे प्रेमळ, तसेच भोळेहि होते. बाजारांत कांहीं खरेदी करावयास गेले म्हणजे ते व्यापाऱ्याला मालाची किंमत विचारीत. ती त्यानें खरी सांगावी म्हणून ते त्यांच्या डोक्यावर देवाचा प्रसाद ठेवीत. देवाशपथ व्यापारी जी किंमत सांगे, ती ते बिनतक्रार देत. ते आपल्या मित्रांना कधीं उसनवार पैसे देत, पण ते कोणी परत करीत नसे. त्याबद्दल बाबा कधीं कुरकुरत नसत. त्यांनीं कधीं कर्जावर व्याज घेतले नाहीं आणि घराचें भाडें वसूल केलें नाहीं.

शेवटीं संस्थानच्या राजाशीं त्यांचें भांडण झालें, तेव्हां त्यांनीं ताड्दिशीं नोकरी सोडून दिली. त्यामुळें घरादाराचें फार हाल होऊं लागले. तरी बाबांचें भजन–पूजन अखंड चालूं. श्रीगुरुचरित्राचें पारायण

ते नित्य करीत आणि त्याचा अर्थ सांगत. तों ऐकण्यास भाविक मंडळीं जमत.

एकदां अशी टूम निघाली कीं, सर्वांनीं नरसोबाच्या वाडीस जाऊन दत्ताचें दर्शन घ्यावें व कोल्हापूरला जाऊन अंबाबाईची यात्रा करावी. गाडी-बैल घरचे, गाडी-माणसेंहि घरचींच. बाबा, आई, चार मुलें आणि एकदोन माणसें-असे सारेजण स्वत:च्या बैलगाडीतून मजेनें निघालें. जमखिंडीहून प्रथम ते नरसोबाच्या वाडीस गेले. नंतर त्यांनीं कोल्हापूर गांठलें. या यात्रेचा धार्मिक संस्कार विठ्ठलाच्या मनावर खोल उमटला.

बाबांची बेकारी, त्यांतून गरिबी. त्यांत आळस. मग सहजच व्यसनांचें पीक आलें. बाबा प्रथम गांज्या ओढूं लागले आणि नंतर तर दारूहि पिऊं लागले. इकडे धार्मिक, तर तिकडे व्यसनी. व्यवहाराकडे पूर्ण दुर्लक्ष; संसाराकडे पाठ फिरविलेली. त्यामुळें कुटुंबाचा सारा भार आईच्या शिरावर. सोळा वर्षें असा खडतर काळ त्या कुटुंबानें काढला. १८९० च्या सुमारास संस्थानिकांनीं त्यांना बोलावून घेतलें व कोठीवाल्याचें विश्वासाचें काम दिलें; पगार मात्र दरमहा फक्त १० रुपये. अशा परिस्थितींत, अशा आई-बापांच्या पोटीं विठ्ठलाचा जन्म चैत्र वद्य एकादशी या पवित्र दिवशीं झाला. त्या दिवशीं एप्रिल महिन्याची २३ तारीख होती. १८७३ सालीं जन्मास आलेल्या या विठ्ठलाने ७१ वर्षांचें दीर्घायुष्य उपभोगलें. त्यांच्या आईला एकूण २० मुलें झाली; त्यापैकीं विठ्ठल हा पांचवा.

◆ ◆ ◆

..., ठाणें. स्थळप्रत
..................... दि: ......................
..................................... नों दि: ..............



# दोन

जमखंडी हें एक संस्थान. संस्थान म्हणजे स्वराज्य. भारतावर जेव्हां इंग्रजांचें राज्य होतें, तेव्हां लहान-मोठीं ५६० संस्थानें होतीं. त्यांत राज्य करणारे लोक भारतीय असत. स्वकीयांचें राज्य म्हणून स्वराज्य. पण स्वराज्य म्हणजे सर्वत्र सुराज्य होतेंच असें नाहीं. म्हैसूर, बडोदें, औंध अशा कांहीं संस्थानांत स्वराज्य होतें आणि सुराज्य पण होतें. तसेंच एक संस्थान म्हणजे जमखंडी.

पण हें संस्थान अगदीं लहान. त्याची राजधानी म्हणजे जमखंडी गांव. त्याची वस्ती किती? १५००० आणि साऱ्या संस्थानचें वार्षिक उत्पन्न किती? ५ लाख! एखाद्या सावकारा–जमीनदारा-सारखाच तो राजा. पण त्याला अधिकार किती? वाटेल त्याला तो फांशी देऊं शके आणि वाटेल ती सुधारणा करूं शके. तशी एक मोठी सुधारणा म्हणजे मोफत शिक्षण. सारें शिक्षण विनामूल्य. नांवाला

फक्त १ आणा फी घेत. त्यांमुळें पैशावांचून कोणाचें शिक्षण अडत नसे. त्याचा फायदा विठ्ठलानें घेतला. मराठी पांचवी इयत्ता तो उत्तीर्ण झाला, वयाच्या १२ व्या वर्षी. नंतर तो गेला हायस्कूलांत. १८८५ सालीं इंग्रजी पहिल्या इयत्तेंत तो बसला.

मराठ्याचा मुलगा असून ब्राह्मणासारखा बुद्धिमान् आहे, असें पाहून सारे शिक्षक विठ्ठलावर प्रेम करीत — त्याचे कौतुक करीत. कोणाहि ब्राह्मणानें जातिभेदामुळें शाळेंत त्याचा हेवा किंवा द्वेष कधींहि केला नाहीं. एक शिक्षक फार रागीट होते — तिरसट होते — त्यानें एके दिवशीं विठ्ठलाला मारलें — इतकें कीं, त्याच्या मांडींतून भळभळा रक्त वाहूं लागलें. तशाच अवस्थेंत विठ्ठल घरीं गेला. रामजी-बाबा घरीं होते. त्यांनीं तें पाहिलें. आपल्या लहान मुलाला गुरा-सारखे झोडपलेलें पाहून त्यांचें पित्त खवळलें. त्यांनीं आपला कर्नाटकी पद्धतीचा मोठा रुमाल डोक्यावर चढविला, अंगांत मराठा बाण्याचा अंगरखा घातला आणि त्यावर उपरणें फेकून तरातरा चालत ते शाळेंत गेले. तेथें त्यांनीं त्या शिक्षकाचा खरपूस समाचार घेतला. तेव्हांपासून विठ्ठलाच्या अंगाला हात कोणाहि शिक्षकानें कधींहि लावला नाहीं.

शाळेंत विठ्ठलाचा अभ्यास चांगला चालला होता. त्याला कंटाळा असे फक्त इंग्रजी स्पेलिंग पाठ करण्याचा. इंग्रजी भाषेंत स्पेलिंग ही एक लहरी — चंचल गोष्ट आहे. कोणत्या शब्दाचें स्पेलिंग कसें असेल ह्याचा कांहीं नियम नाहीं. त्यांमुळें परभाषेच्या विद्यार्थ्यानें इंग्रजी स्पेलिंग ध्यानांत ठेवणें हें फार अवघड जातें. तें पाठ करतांना विठ्ठलाचें

तर डोकें दुखूं लागे. त्याला त्याचा बाऊ इतका वाटे कीं, तो टाळण्यासाठीं आपण जीव द्यावा असें त्याच्या मनांत येई. पण महत्त्वाकांक्षा मोठी. त्यामुळें प्रयत्न मोठा. त्याचें फल म्हणजे पहिल्या इयत्तेंत तो उत्तम रीतीनें उत्तीर्ण झाला. आणि दुसऱ्या इयत्तेंत तर काय? त्याचा नेहमीं पहिला क्रमांक. रोजच्या गुणांची बेरीज होऊन महिन्याचे शेवटीं क्रमांक लागत. दर महिन्याला विठ्ठलाचा क्रमांक आपला पहिला. अशा यशाच्या पायऱ्यांवरून तो थेट सातवीपर्यंत गेला. १८९१ च्या डिसेंबरमध्यें तो मॅट्रिक झाला. त्या वेळीं त्याचें वय १८ वर्षांचें होतें.

यशाचा हा पहिला किल्ला सर करीपर्यंत विठ्ठलाला खूप कष्ट करावे लागले. त्यानें इंग्रजी ग्रंथांचें वाचन मनापासून केलें, तसेंच संस्कृत व मराठी ग्रंथहि अभ्यासिले. रामविजय, हरीविजय, भक्तिविजय, पांडव-प्रताप या पोथ्या वाचून त्यांचा अर्थ तो आपल्या वर्गांतल्या मुलांना सांगे. 'नवनीता' वर तर साऱ्या मुलांच्या उड्या बोक्यांप्रमाणें पडत. रघुवंश, कादंबरी, शाकुंतल या संस्कृत ग्रंथाप्रमाणेंच मराठींतील नल-दमयंती आख्यान विठ्ठलानें मोठ्या प्रेमानें वाचलें. त्यामुळें हायस्कुलांतलें शिक्षण घेतांना त्याच्या मनाला फार आनंद वाटे. त्या आनंदाचें वर्णन पुढें त्यानें स्वतःच पुढील शब्दांनीं केलें, "एखाद्या मनोऱ्यावर चढत असतांना प्रत्येक मजल्याभोंवतालचें क्षितिज अधिकाधिक विस्तीर्ण होऊन ज्याप्रमाणें जास्त प्रदेश दृष्टीच्या टापूंत येतो व आनंद वाढतो, त्याप्रमाणें माझा हा हायस्कूलमधला अभ्यासक्रम मला फार चित्तवेधक व बोधकारक झाला."

या बौद्धिक शिक्षणाबरोबरच शारीरिक शिक्षणाकडेहि विठ्ठल लक्ष पुरवीत असे. सोंगट्यांचा बैठा खेळ सबंध रात्रभर त्याच्या घरीं सणावारीं चाले. एकदां विठ्ठल व त्याचा भाऊ एकीकडे आणि सुमारें त्याच्याच वयाचे त्यांचे मामा दुसरीकडे — असा सोंगटयांचा सामना सुरू झाला. कवड्यांचा खळखळाट चालू झाला. सारे इरेला पेटले— चिडूं लागले. शब्दयुद्ध संपून मल्लयुद्ध सुरू झालें. मामा-भाच्यांचें भांडण सोडविण्यासाठीं आई स्वयंपाकघरांतून बाहेर आली. सोंगटया-प्रमाणेंच पत्ते व गंजिफा हें खेळहि विठ्ठल खेळत असे.

पण यापेक्षांहि मैदानी खेळांत विठ्ठलाचें मन अधिक रमे. खो खो, हुतुतू, आटयापाटया वगैरे खेळ खेळण्यांत त्याचा पाय नेहमीं पुढें. अंगांतून घाम निघेपर्यंत तो ते खेळ खेळे. त्याशिवाय ‘ किर्र ’ नांवांचाहि एक खेळ तो मोठ्या आवडीनें खेळे. त्यांत हारलेल्या बाजूचे गडी एकामागें एक कंबरेला धरून वांकून उभे राहात आणि विजयी बाजूचे गडी लांबून धावत येऊन त्यांच्यावर स्वार होत. ते बराच वेळ बसले आणि भार सहन होईनासा झाला, म्हणजे खालच्यापैकीं कोणीतरी ‘ किर्र ’ म्हटलें कीं ते खालीं उतरून उडी घेत.

जमखंडी गांवांभोंवतीं डोंगरांच्या रांगा असत; आणि तळ्यांच्या कांठीं रम्य आंबराया असत. तेथें विठ्ठल आपल्या सवंगडयांसह संध्याकाळीं जाई. सारीं मुलें झाडावर चढून सूरपारंब्यांचा खेळ मोठ्या उत्साहानें खेळत. वडाच्या पारंब्या धरून खालीं उडया टाकल्यामुळें

पुष्कळ वेळां त्याचें कपडे फाटत—कधीं कधीं—शरिराचेहि ओरखाडे निघत.

विशेष म्हणजे फाटलेले कपडे किंवा कातडे घरांत कोणालाहि दाखवावयाचे नाहीं; असा लपंडावाचा खेळ नंतर चाले. हातपाय मुरगळलेला, डोकीला खोंक पडलेली, पाठ खरचटलेली, शिरा ताणलेल्या व हाडेन् हाडें खिळखिळी झालेली, अशा स्थितींत घरीं आलेल्या गड्याला पुन: एक आठवडा तरी आंबराईकडे जाण्याची इच्छा होतें कशाला! पण दुसऱ्या आठवड्यांत पुन: हीं माकडें झाडावर आहेतच तयार!

चैत्र महिन्यांत श्रीमंत अप्पासाहेब रामतीर्थांत गुरांचें जंगी प्रदर्शन करीत. त्या वेळीं मोठ्या मोठ्या शक्तिवान बैलांची ओझ्यानें भरलेल्या गाड्या ओढण्याची शर्यत होत असे. ती पाहण्यास गांवोंगांवच्या लोकांचीं मोठी गर्दी जमे. एकदां ही शर्यत पाहण्यासाठीं विठ्ठल आणि त्याचा भाऊ गेले होते. गर्दींत त्या मुलांना कसें दिसणार? म्हणून ती एका मोठ्या झाडावर चढलीं. पण त्या झाडावर अगोदरच पुष्कळ माणसें चढून पाहात होतीं. त्या झाडाच्या एका मोठ्या उंच आणि लांब फांदीवर इतकीं माणसें गर्दी करून बसलीं कीं, शेवटीं भार सहन न होऊन ती सबंध फांदी माणसांसह तुटून खालीं पडली. खालीं देखील माणसांची गर्दीच होती. त्यामुळें हाहा:कार झाला. विठ्ठलहि उंचीवरून खालीं पडला. गर्दींत पडला म्हणून हातपाय मोडलें नाहींत; पण विलक्षण ओरखडले होतें; इतक्यांत पोलिसांची धराधरी चालली. मग विठ्ठलहि जीव घेऊन पळत सुटला. लग्नातलें मोठें लांब लाल पागोटें

झाडाच्या फांदीत अडकलेलें व लग्नांतला लांब चिटाचा अंगरखा फाटलेला. शिवाय धोतर पायांत अडकत होतें. पोलीस तर धरावयास जवळ आलेला. पण सर्वांना चुकवून व पागोटें झटकन् ओढून घेऊन व शेंडी सावरीत विठ्ठलनें जी धूम ठोकली, ती दीड मैल मागें न पाहतां घरापर्यंत मजल गांठली! अशा गंमती जमती बालपणांतील.

सूरपारंब्या प्रमाणेंच सूरपाट्यांचा खेळ खेळण्यांतहि विठ्ठलाचा हातखंडा असे. देऊळ असो वा दर्गा असो, त्याच्या प्रशस्त पटांगणांत त्याची टोळी सूरपाट्या हिरीरीनें खेळे. त्या टोळीचा नायक म्हणजे विठ्ठल. एकदां जमखंडीच्या राजेसाहेबांनीं उन्हाळ्यांत या साऱ्या खेळाडूंना आपल्या राजवाड्यांत बोलावून साखरपाण्याचे पेले पाजलें. तेव्हां सर्वांना आपल्या अंगावर मूठभर मांस चढल्यासारखें झालें.

अशा खेळांत काय, किंवा वनभोजनांत काय ब्राह्मण, मराठे, लिंगायत, मुसलमान वगैरे सर्व जातीचें विद्यार्थी असत. जातिभेदाचें नांव नसे. तसेंच श्रीमंत–गरीबीचा भेदभावहि नसे. मुलामध्यें एकात्मता उपजत असते–आणि खेळण्याचें वेळीं तर विशेषच.

या मैदानी खेळांशिवाय नाना हुन्नर करण्यांतहि विठ्ठलाची बुद्धि चाले. त्याच्या टोळीला एकदां चित्रें काढण्याचा नाद लागला. तुळशी कट्ट्यावरील भिंतीवर विठ्ठलानें रामपंचायतनाचें भलेंमोठें रंगीत चित्र काढलें. तसेंच एके वर्षीं या माकड–मंडळानें गणपती करावयाचें ठरविलें. दोन–तीन मैल दूर जाऊन डोंगरावरून सर्वांनीं शाडू आणली आणि बनविलें गणपती. त्या गणपतींची पूजा त्या वर्षीं त्यांच्या त्यांच्या घरीं

झालीं. एकदां साबण करण्याची टूम निघाली. साबण असा फर्मास तयार झाला कीं त्यामुळें कपडा फाटे पण डाग निघत नसे. उलट, साबणाचे नवे डाग कपड्याला पडत ! मात्र शाईचा कारखाना यशस्वी झाला. बाभळीच्या शेंगा शिजवून त्यांत हिरडा व हिराकस घालून विठ्ठल व त्याचें सोबती शाईच्या बाटल्या भरभरून ठेवीत.

अशा खेळांतून व उद्योगांतून विठ्ठलाच्या मनावर सहकार्याचें व संघटनेचें संस्कार होत होते. आणि त्याबरोबरच त्याचें शरीर खंबीर व कणखर बनत होतें. हे संस्कार म्हणजे टाकीचें घांवच ! ते घांव सोसल्यानेंच दगडाला देवपण येतें.

सर्वांत मुख्य संस्कार विठ्ठलाच्या मनावर झाले त्याच्या आईचे. तिनें त्याचें हृदयच जणूं घडविलें. त्यामुळेंच धर्माच्या भक्तिरसांत व नंतर तत्त्वज्ञानाच्या शांतरसांत तें हृदय भिजून निघालें. कादंबऱ्यांनीं व पोथ्यांनीं विठ्ठलाच्या मनाची पुष्कळच घडण केली असली, तरी दैवी भावनांचा ठसा उमटविला त्याच्या आईनें. आईला घरकामांत मदत करण्यांत विठ्ठलाला भारी आनंद वाटे. नागपंचमीचे लाह्यापीठाचें लाडू, गणेश चतुर्थीचें मोदक, नवरात्रीच्या कडकण्या, दिवाळीच्या करंज्या-कडबोळी, मोहरमांतील मलीदा-चोंगे वगैरे खाण्याचे पदार्थ करण्याला विठ्ठल स्वतःचीं पुस्तकें टाकून आईच्या हाताखालीं काम करण्यास इतका सुळसुळत असे कीं, जणुं तिची तो एक सूनच ! त्याच्या आईनें पुरण घातलें कीं कणीक मळू करण्याला विठ्ठल काच्या मारून सज्ज होई !—जसा कांहीं दुःशासनवधासाठीं उभा असलेला भीमच ! अशा वेळीं रामायण-भारतांतले श्लोक, वामनाचे श्लोक,

मोरोपंताच्या आर्या आईपुढें म्हणून दाखविण्यासाठीं त्याच्या तोंडाचा पट्टा सुरू होई. श्रीधर, मुक्तेश्वर, महिपती इत्यादि मराठी कवींच्या पौराणिक पोथ्या विठ्ठलानें हायस्कूलांत असतांनाच वाचून काढल्या होत्या. व्यंकटेश-स्तोत्र, शनि-माहात्म्य, या लहान लहान पोथ्या तर त्याला तोंडपाठ असत.

असें अवांतर वाचन आणि उद्योग खेळ यांत विठ्ठलाचा वेळ कितीहि गेला, तरी हायस्कुलांत पहिल्या वर्गापासून शेवटच्या वर्गापर्यंत त्याचा क्रमांक पहिलाच असे. त्याची बुद्धि तीव्र, लक्ष एकाग्र व अभ्यास नियमित—त्यामुळें त्याला सर्व परीक्षांत घवघवीत यश मिळे. अशा यशाचें गांठोडें पाठीशीं बांधून विठ्ठलाची स्वारी १८९२ सालीं पुणें येथें आली. तेथें ६ वर्षं राहून त्यानें कॉलेजचें शिक्षण घेतलें.

कॉलेजचें शिक्षण ! किती रम्य, किती सुखदायक ! ! पण कोणाला ? ज्याचे घरीं ऋद्धि सिद्धि पाणी भरीं त्याला ! इतरांचें काय ? “ दरिद्राणां मनोरथाः ” समुद्राच्या लाटाप्रमाणें ते उसळतात नि फुटतात. जशी केशर—कस्तूरी, तशीच कॉलेजची विद्या गरिबाला कधीहि हस्तगत व्हावयाची नाहीं.

पण नाहीं ! या महाराष्ट्रांत तरी गरिबांनींच विद्येचें अपार धन लुटलें आहे. ते प्रि. आगरकर ते महर्षि कर्वे गरिबीच्या चिखलांतूनच वर आलेलीं कमळें ना ? या विद्येच्या वारकऱ्यांनीं १५०।१५० मैलांची पायपिटी करून विद्येची उपासना केली आणि तिला प्रसन्न करून घेतले ना ? विठ्ठलराव शिंदे हे तसलेच एक विद्या-वीर !

93130



महर्षि कर्वे

विठ्ठलराव पुण्यास गेले. म्हस्के वकील ह्यांना भेटले. त्या काळीं मराठी लोकांत हेच गृहस्थ सर्वांत जास्त इंग्रजी शिकलेले होते — वकिलींत पुढारलेलें व नागरिकांत मान्यता पावलेलें. त्यांनीं मराठ्यांच्या मुलांना कॉलेजांत मदत करण्यासाठीं "डेक्कन मराठा एज्युकेशन-असोसिएशन" नांवाची संस्था स्थापन केली होती. ते लष्करांत रहात. विठ्ठलराव लष्करांत गेले. तेथील उंची, उंची दुकानें पाहून त्यांचे डोळे दिपले. म्हस्केसाहेब त्यांच्याशीं इंग्रजींतून बोलले आणि तेहि लठ्ठ परदेशी चिरूट ओढतां ओढतां. त्यांनीं विठ्ठलरावांना दरमहा दहा रुपयांची शिष्यवृत्ति देण्याचें मान्य केलें.

पण १० रुपयांत काय होणार? ५ रुपये तर कॉलेजची नुसती फी; आणि खानावळीसाठीं ५ रुपये. मग पुस्तकें—कपडे—घरभाडें—वगैरेंचा खर्च कोठून करावयाचा? त्यासाठीं विठ्ठलराव एकदां प्रि. आगरकर यांचेकडे गेले. सकाळीं ९ वाजण्याची वेळ. दिवस हिवाळ्याचे. आगरकर आपल्या झोपडीच्या बाहेर आंगणांत उभे होते.

...२

त्यांच्या अंगांत जवळ-जवळ फाटलेला काळा मळकट लोंकरी कोट होता. त्या ' सुधारक '—कर्त्यापुढें विठ्ठलराव भीत भीत गेले आणि कॉलेजची फी माफ करण्याबद्दल त्यांनीं अर्ज दिला. तो पाहून आगरकरांनीं नकारार्थी मान हालविली. " एका संस्थेची शिष्यवृत्ति तुला मिळत आहे ना ? मग फीची माफी कशी देता येईल ? " असें उत्तर आगरकरांनीं दिलें. न्यायतः त्यांचें उत्तर बरोबरच होतें, पण विठ्ठलरावांची निराशा झाली.



प्रि. आगरकर

अशा काट्याकुट्यांतून वाट तुडवीत विठ्ठलरावांची विद्येची वारी चालूच होती. काटकसर कमालीची ते करीत. दिवाळीच्या सुट्टींत ते घरीं गेले तर कुडची स्टेशनावरून ते ३२ मैल पायीं चालत जात. बैलगाडीला देण्यासाठीं ४ आणेसुद्धां त्यांच्यापाशीं नसत. पोट बांधून व हाल सोसून कॉलेजांतील पहिल्या वर्षाचा अभ्यास विठ्ठलरावांनीं पुरा केला.

वर्ष संपलें—अभ्यास संपला. परीक्षा आली—नंतर सुटी होणार—मग मौजच मौज ! या विचारांत सारे विद्यार्थी गुंग ! पण गरीब विठ्ठलरावांना ही मौज कोठें मिळायला ? परीक्षा म्हटलें कीं, त्यांच्या पोटांत धस्स् झालें. कारण परीक्षेची फी २० रुपये ! ती कोठून

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ... विः ...
स्थळांक ... नों. दि. ...



आणावयाची ? त्यासाठीं वण्वण हिंडून भीक मागण्याची पाळी आली. न्या. रानडे, डॉ. भांडारकर, रा. ब. नवलकर अशा थोर थोर माणसांकडे जाऊन त्यांनीं फीसाठीं हात पसरला. रुपये सारे१४च जमले. फी भरण्याची घाई तर अगदीं गळ्याला फांसासारखीं लागली. म्हणून एके दिवशीं—



न्या. रानडे

"डॉ. शेळके आपणच का ?"

"होय ! काय काम आहे तुमचं ?"

"मी कॉलेजांतला एक विद्यार्थी आहे. परीक्षेची फी मला भरायची आहे. २० पैकीं १४ रुपये मीं लोकांकडून मिळविलें आहेत. रा. ब. नवलकरांनीं आपल्याला चिठ्ठी दिली आहे. आपण मला मदत केल्यास मीं आपले उपकार जन्मभर विसरणार नाहीं."

"नांव काय तुझं ?"

"विठ्ठल रामजी शिंदे"



डॉ. भांडारकर

" शिंदे ? ग्वाल्हेरचे शिंदे ? अन् अशी भीक मागत हिंडतोस ? मराठ्यांच्या कुळांत जन्मून भिक्षापात्र मिरवण्याची तुला लाज वाटत नाहीं ? जवळ पैसे नसतील, तर शिकावें कशाला ? गुरें राखावींत."

जळत्या निखाऱ्यांचा पाऊस पडावा, तसे हे शब्द विठ्ठलरावांच्या मनाला जाळीत गेले. बरें, असा मराठ्यांचा मोठा कैवार घेणाऱ्या त्या मराठा डॉक्टरानें कांहीं मदत केली कां ? दिडकीसुद्धां नाहीं. " एका जातीचा, चांगला शिकलेला, पैसा बाळगणारा, हा माणूस आपल्या हृदयाला घरें पाडतो—मदत नाहीं, प्रोत्साहन नाहीं, साधी सहानुभूतीहि नाहीं. मग आपल्या या कष्टांचें कौतुक कोठलें !. काय म्हणावें या जगाला !" असे विचारामागून विचार विठ्ठलरावांच्या मनांत गर्दी करूं लागले—जसें कांहीं पावसाळी आकाशांतील ढगच ! ते निराश झाले—जगाला विटले.

पण नाहीं. जग असें एकांगीं नाहीं. त्यांत केवळ वाईटच माणसें आहेत असें नाहीं—आणि चांगलींच आहेत असेंहि पण नाहीं. सारे नमुने जगांत आहेत. समाज संमिश्र आहे. जेथें कांटेरी बाभळीचीं झाडें आहेत, तेथेंच रसाळ आंब्यांचीं झाडें पण आहेत. असेंच एक रसाळ फळ विठ्ठलरावांच्या पदरांत ऐन वेळीं अकल्पितपणें पडलें

विठ्ठलरावांचे एक बालमित्र विष्णुपंत देशपांडे. त्यांची पत्नी बहिणाबाई. तिच्या कानीं विठ्ठलरावांची आर्थिक ओढाताण गेली. लगेच तिनें भाऊबीजेच्या ओवाळणींत आपल्याला मिळालेले २० रुपये या मानलेल्या भावाला पोहोचते केले ! डोंगराएवढे उपकार वाटले

विठ्ठलरावांना. दिव्यांतील तेल संपायचें वेळीं त्यांत कोणी तेल ओतून तो दिवा पुन: प्रज्वलित करावा, तसें हें साहाय्य होतें. विठ्ठलरावांची निराशा पळाली. त्यांनीं मुंबईस जाऊन पहिल्या वर्षाची परीक्षा दिली. त्यांत त्यांना यश मिळालें. त्यामुळें त्यांच्या आईबापांना फार आनंद झाला.

इंटरचा अभ्यास विठ्ठलरावांनीं सुरू केला, पण अभ्यासापेक्षां इतर गोष्टींकडेच त्यांचें लक्ष असे. कॉलेजांतील शिक्षण म्हणजे केवळ वर्गामध्यें नेमलेल्या पुस्तकांतून मिळतें तेवढेंच नसतें, तर त्या शिक्षणाचे झरे आजूबाजूच्या वातावरणांतून झिरपत येत असतात, आणि पुणें म्हणजे तर अशा सर्वविध ज्ञानाचें सरोवरच! मिल्‌ व मेकॉले यांचें ग्रंथ विठ्ठलरावांनीं वाचले, त्याच-प्रमाणें स्पेन्सरचा अज्ञेयवादहि त्यांनीं अभ्यासिला, त्याकाळीं बहुतेक सर्व इंग्रजी शिकलेले तरुण नास्तिक बनत. पाश्चात्य शिक्षणाच्या वावटळीनें त्यांची ईश्वरावरील श्रद्धा उडविली जाई. विठ्ठलरावांचे बाबतींत असेंच घडलें. जमखिंडींतल्या विठ्ठलरावांच्या वाड्यांतल्या अंधेऱ्या देवघरांत बसून श्रीशिवलीलामृताचें पारायण करीत शिवलिंगावर श्रावणी सोमवारीं सहस्त्रदळें वाहिल्या-शिवाय तोंडांत पाणी न घेणारे विठ्ठलराव पुण्याला आल्यावर आगरकरांचें सुधारकी व मिल्‌स्पेन्सरचे बुद्धिवादी ग्रंथ वाचून पूर्ण नास्तिक बनलें.



स्पेन्सर

स्वत: ते नास्तिक बनले, एवढेंच नव्हें तर, आपल्याला नव्यानेंच प्राप्त झालेल्या नास्तिकवादाची दीक्षा तें आपल्या मित्रमंडळींना देऊं

लागले. त्यासाठीं त्यांनीं आपल्या राहत्या खोलींत एक चर्चामंडळ स्थापन केलें. जमखंडीतील वसंत व्याख्यानमालेंत भाषण करण्याची संवय त्यांना झालीच होती. तिला येथें पालवी फुटली इतकेंच. भाषणाप्रमाणेंच लेखनहि ते करीत. नास्तिकतेवर त्यांनीं एक इंग्रजी निबंध लिहिला. त्यांत त्यांनीं असा सिद्धान्त मांडला कीं, देवानें माणसाला निर्माण केलें नसून माणसानेंच देवाला निर्माण केलें. हा नास्तिकतेचा भगारा पुढें प्रार्थनासमाजाच्या आघातानें फुटला.

धर्माधर्माच्या झंझावातांत विठ्ठलरावांचें मन सांपडल्यामुळें त्यांचेकडून कॉलेजचा अभ्यास नीट झाला नाहीं. त्याचा परिणाम साहजिकच नापास होण्यांत झाला. पुढील वर्षी पुनः त्यांनीं इंटरचा अभ्यास सुरू केला. यावेळीं त्यांनीं आपल्या शरिराकडे विशेष लक्ष दिलें. ते व त्यांचे सोबती दूरदूर फिरावयास जात. त्या वेळीं फर्ग्युसन कॉलेजची नवी इमारत बांधली जात होती. तेथें हे विद्यार्थी हक्कानें जात. परत येतांना कच्च्या कैऱ्या व डाळ मुरमुरें खात. घरीं ते सपाटून व्यायाम करीत. त्याला खुराक पाहिजे; तो गरीबानें कोठून आणावयाचा ? तेव्हां भिजलेली डाळ, वाळलेलें खोबरें आणि सुकलेल्या खारका यांच्यावर तें ताव मारीत.

१८९५ सालीं पुणें येथें काँग्रेसचें अधिवेशन भरलें. तेव्हां विठ्ठलरावांनीं स्वयंसेवक म्हणून काम केलें. स्वधर्माप्रमाणेंच स्वदेशाचीहि चिंता त्यांना वाटूं लागली.

विठ्ठलराव इंटर झाले. बी. ए. ला त्यांनीं इतिहास व कायदा हे विषय घेतले. कायद्यावरील व्याख्यानें ऐकण्यासाठीं त्यांना आठवड्यांतून

दोनदां डेक्कन कॉलेजांत जावें लागे. ते पायीं जात. ' पावसांत भिजत व उन्हाळ्यांत शिजत ' हा पल्ला ते गाठीत. त्याचें त्यांना दुखः नसे, उलट आनंद वाटे, पण एकदां काय झालें ?—

कॉलेजवरून निघण्यास विठ्ठलरावांना उशीर झाला. संध्याकाळ संपली— रात्र पडली तरी तें एकटें त्या ओसाड वाटेनें चालत आले. शेतें तुडवीत ते 'संगमा'जवळ आले. मुळा व मुठा या नद्या छोट्या खऱ्या, पण संगम झाल्यावर त्या मोठ्या बनल्या. एकीचें बळ ! त्यांच्या पात्रांतून पायीं जाणें कठीण, म्हणून संगमावर होडी चालू असते. पण रात्र झाल्यावर होडीवाला तेथें राहतो कशाला ? होडी असून-नसून सारखीच, " आतां काय करावें ? " असा प्रश्न विठ्ठलरावांना पडला. पण त्यांचें शरीर दणकट व मन साहसी. त्यांनीं आपलें अंगावरचें सारे कपडे काढले आणि ते डोक्याला गुंडाळलें. पोहत पोहत ते पैलतीराला आले. घरीं गेल्यावर आपल्या मित्रांना त्यांनीं आपला पराक्रम सांगितला, तेव्हां मित्र चकित झाले.

◆ ◆ ◆



# तीन

तो काळ फार धामधुमीचा होता. प्लेगनें पुण्यांत धुमाकूळ माजविला होता. त्यांत गोऱ्या सोजिरांची दांडगाई. त्यामुळें सारे लोक हवालदिल झालेले. शाळा-कॉलेजें बंद झालेलीं, तशांत हिंदु-मुसलमानांचें दंगे पेटले. हाहा:कार उडाला. मग अभ्यासाकडे लक्ष लागेल कसें? पुष्कळ विद्यार्थी नापास झाले. त्यांतच विठ्ठलराव एक !

पुन: १८९८ सालीं ते बी.ए.ला बसले—उत्तीर्ण झाले. कायद्याच्या विषयांत तर प्रथम श्रेणीचे गुण मिळाले. त्यामुळें एल्एल्.बी.ची पहिली परीक्षा उत्तीर्ण झाल्याचें श्रेय त्यांना मिळालें. त्या वेळी विद्यापिठाचा तसा नियमच होता. पुढें दोन वर्षें सेकंड एल्एल्.बी.चा अभ्यास त्यांनीं केला. पण परदेशी जाण्याचा योग अकस्मात आल्यानें वकिलीची पदवी कांहीं त्यांच्या पदरांत पडली नाहीं.

ह्या विद्याभ्यास करीत असतांनाच विठ्ठलरावांना प्रापंचिक यातना फार भोगाव्या लागल्या. त्यांची बहीण जनाक्का हिचें लग्न झालें होतें, पण तिचा नवरा तिला फार छळूं लागला—इतका कीं, तिला सासरीं राहणें असह्य झालें. तेव्हां विठ्ठलरावांनीं पुढाकार घेऊन तिला माहेरीं आणलें. एका फाटक्या लुगड्यानिशीं नवऱ्यानें तिला पाठविलें. तिचें सारें आयुष्य कसें जाणार? ही विवंचना विठ्ठलरावांच्या चित्ताला पोखरूं लागली. ते तिला व आपल्या आईस घेऊन पुण्यास आले. बहिणीला शिक्षण द्यावें असा त्यांचा हेतु. त्याप्रमाणें त्यांनीं जनक्काला चिमण्या गणपतीजवळील खिस्ती मिशनच्या प्राथमिक शाळेंत घातलें.

पण इतका सारा खर्च भागणार कसा? याच वेळीं रामजी बाबांची नोकरी गेलेली; आणि विठ्ठलरावांची प्राप्ती म्हणजे फक्त दहा रुपयांची शिष्यवृत्ति. तेवढ्यांत शाळा-कॉलेजांचा खर्च कसा भागणार? म्हणून पंडिता रमाबाई व प्रो. अण्णासाहेब कर्वे यांचेकडे ते गेले व 'आपल्या संस्थेंत माझ्या बहिणीची सोय करा' म्हणाले. पण तशी सोय होऊं शकली नाहीं. म्हणून त्यांनीं हुजूरपागेंत तिला घातलें. तेथें तिला १० रुपयांची शिष्यवृत्ति मिळाली. त्यामुळें विठ्ठलरावांची आर्थिक ओढा–ताण थांबली. दोघांच्या शिष्यवृत्त्यांचें मिळून २० रुपये आणि शिवाय शिकवण्याकरून विठ्ठलराव ५।७ रुपये मिळवीत. तरी पुण्याचा व जमखंडीचा दोन्हीं खर्च भागविणें त्यांना कठीण जाई. कर्जाचा बोजा त्यांच्या डोक्यावर वाढूं लागला. त्यामुळें त्यांची काळजी वाढूं लागली. "प्रपंचाची काळजी ही चवथी जन्माची सख्खी बहीण" बनली.

कर्ज व काळजी यांच्या कात्रींतून सुटण्यासाठीं एकमार्ग विठ्ठलरावांना दिसला. १८९६ मध्यें ते सरळ बडोद्यास गेले. तेथील महाराज श्रीमंत सयाजीराव विद्याप्रेमी व समाज-सुधारक असून उदार वृत्तीचें आहेत, असें त्यांनीं ऐकलें होतें. महाराजांचे कानावर त्यांनीं आपली कहाणी घातली. ती एकतांच महाराजांनीं त्यांना धीर दिला आणि २५ रुपयांची शिष्यवृत्ति पण दिली. तिची अट हीं कीं, शिक्षण संपल्यावर बडोदे संस्थानांत नोकरीस रहावें किंवा शिष्यवृत्तीची रक्कम परत करावी. कायदेशीर करारावर, तिकीट लावून, सही करून, या अटीवर विठ्ठलरावांनीं ती शिष्यवृत्ति आनंदानें स्विकारली. सयाजीरावांनीं आशा कितीतरी विद्येच्या वारकऱ्यांना हातार्शी धरून पुढें नेलें व सरस्वतीच्या मंदिरांत प्रविष्ट केलें !

पुण्यास अभ्यास करीत असतांना विठ्ठलराव 'प्रार्थना-समाजाकडे' वळले. इंग्रजी शिकलेल्या सुधारकांनीं बंगालमध्यें 'ब्राह्मोसमाज' काढला. त्याचीच शाखा महाराष्ट्रांत 'प्रार्थना-समाज' म्हणून वाढत होती. त्यांत न्या. रानडे, डॉ. भांडारकर वगैरे थोर थोर लोक भाग घेत. त्यांच्याशीं विठ्ठलरावांचा निकट संबंध या 'समाजा'मुळें आला. तारीख २९ मे १८८९ मधील रविवारीं सकाळीं पुण्याच्या प्रार्थना-समाजांत त्यांनीं पहिले पाऊल टाकलें—आणि जन्मभर ते त्याचे प्रचारक बनले. केशरचंद्र सेन यांचें चरित्र वाचून तर त्यांची चित्तवृत्ति भडकून गेली. "प्रार्थना-समाजाचा आजन्म वाहून घेतलेला प्रचारक मीं कसा होईना !" अशी तळमळ त्यांना लागून राहिली. रात्रंदिवस तेच तेच विचार त्यांच्या मनांत येत. त्याच त्याच तरुण आणि वृद्ध मंडळींच्या

गांठींभेटी घडल्यानें 'समाजा' शिवाय त्यांना कांहीं दिसेनासें झालें, समाजाचीं मुख्य तत्त्वें म्हणजे निराकाराची उपासना, सामुदायिक ध्यान-धारणा, मूर्तिपूजेला विरोध, ईश्वराचें पितृत्व व मानवांचें बंधुत्व सर्वांची समता व प्रेमपूर्वक जनसेवा.

मंदिरांतील उपासना पाहून विठ्ठलरावांच्या मनांत 'प्रार्थना-समाजा'-विषयीं मोठा पूज्यभाव उत्पन्न झाला. तुकारामांचें अभंग, त्यावरील प्रवचन आणि प्रार्थना हें सर्व ऐकून त्यांचें हृदय हेलावून गेलें. मिल्ल-स्पेन्सरचा बुद्धिवाद व तर्कवाद उखडला गेला; आणि त्याचे जागीं श्रद्धा व भक्ति यांची रोपटीं रोवलीं गेलीं. "तारुण्यांतील आडमुठेपणा, विचारांचा उश्रृंखळपणा व अनुभवाचा हिरवटपणा यांच्या भोंवऱ्यांतून त्यांची सुटका होऊन शुद्ध, उदार, पवित्र धर्माच्या शांत प्रवाहांत" ते शिरले. प्रार्थना-समाजाच्या वार्षिक उत्सवाचें शेवटीं प्रीतिभोजन होत असतें. त्यांत त्यांनीं भाग घेतला. फराळ, भोजन, भजन, प्रार्थना, उपदेश, संभाषण वगैरे कार्यक्रम दिवसभर जिव्हाळ्यानें व समतेनें झाले. तें दृश्य पाहून विठ्ठलरावांना वाटलें, "प्रार्थना-समाज म्हणजे नुसती रविवारची सभा नसून देवाच्या कन्यापुत्रांचें एक शुद्ध कुटुंब आहे."

मुंबईस वकिलीच्या अभ्यासासाठीं विठ्ठलराव गेले असतां तेथील प्रार्थना-समाजांत त्यांनीं उपासना चालविली; एवढेंच नव्हे तर, सुट्टींत जमखंडीस गेल्यावर तेथेंहि ते आपल्या घरीं दर रविवारीं उपासना चालवूं लागले. "हीं उपासना म्हणजे आमच्या भागवत धर्माचीच

सुधारून वाढविलेली एक आवृत्ति आहे.” असें त्यांचें वडील म्हणूं लागले !

योगायोग असा कीं, १८९९ सालीं पुण्यांतील एक शिक्षक इंग्लंडला तौलनिक धर्मांच्या अभ्यासासाठीं निघालें. त्यांना एक शिष्यवृत्ति मिळाली होती. पण तें वाटेंतच मरण पावलें. हें ऐकून डॉ. भांडारकर यांना फार दुःख झालें. पुण्याच्या प्रार्थना-समाजांत उपासना करतांना त्यांच्या डोळ्यांतून अश्रु वहात होतें. भांडारकर व्यासपीठावरून उतरले. तेव्हां विठ्ठलराव त्यांना भेटलें व म्हणाले, “मीं धर्मांच्या तौलनिक अभ्यासासाठीं इंग्लंडला जाण्यास तयार आहे. शक्य असल्यास आपण मला पाठवावें.”

या अभ्यासासाठीं इंग्लंडमधील एक संस्था वर्षाला १०० पौंडांची शिष्यवृत्ति एका हिंदी विद्यार्थ्यास, २ वर्षें देत असे. पण त्या विद्यार्थ्याची निवड ‘ब्राह्म समाजा’च्या एका समितीनें करावयाची होती. त्या समितीची अट अशी कीं, त्या विद्यार्थ्यानें ब्राह्म-समाजाच्या प्रचाराचें कार्य आजन्म केलें पाहिजे. मात्र इंग्लंडला जाण्याचा प्रवासखर्च त्या विद्यार्थ्यानें करावयाचा होता.

हा प्रवास-खर्च कोठून आणावयाचा ? शिवाय दुसऱ्या एल्. एल्. बी. ची परीक्षा राहिलेली आणि घरांतील अडचणी तर अनंत. साऱ्या कुटुंबाची जबाबदारी डोक्यावर ! असें असतांनाहि विठ्ठलरावांनीं केवळ ‘परमेश्वरी आदेश’ समजून आपला निश्चय भांडारकरांना कळविला. त्यांनीं त्यांना आनंदानें संमति दिली.

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे ...
अनुक्रमांक ........ दि: ........
क्रमांक ........ नोंद दि. ........

प्रश्न आला पैशाचा. निदान दीड हजार रुपये तरी पाहिजेत. कोण देणार ते ?


सयाजीराव गायकवाड

श्रीमंत सयाजीरावांनीं ५ वर्षें शिष्यवृत्ति देऊन दीड हजार रुपये दिले होते. तें ऋण आपण केव्हां, कसें फेडणार ? आणि दीड हजारांचें हें नव ऋण आपल्याला कोण, कसें देणार ?

दुसरें कोण? **श्रीमंत सयाजीरावच !**

विठ्ठलरावांची महत्त्वाकांक्षा जबर. ती त्यांना स्वस्थ बसूं देईना. त्या वावटळीपुढें अडीअडचणींचा पालापाचोळा टिकेल कसा ? ते तडक बडोद्यास गेले आणि सरळ महाराजांस भेटले. तेव्हां पुढील मजेशीर संवाद झाला.

" काय शिंदे ? आमच्या पैशाची काय वाट ? "

" महाराज, जुन्या पैशाची वाट मला माहीत नाहीं, पण नव्या पैशाची मागणी करावयास मी आलों आहें. "

" नवे पैसे ? आणि ते किती ? "

" फक्त दीड हजार रुपये. "

" आणि ते हो कशाला ? पहिले अपुरे पडले कीं काय ? "

" नाहीं महाराज, मला इंग्लंडला जाण्याचा योग आला आहे. धर्मांच्या तौलनिक अभ्यासासाठीं एक शिष्यवृत्ति मला मिळत आहे. म्हणून प्रवास-खर्चासाठीं दीड हजार रुपये मला हवे आहेत. हें कार्य ईश्वराचें आहे आणि तें महाराजांस पसंत पडणारें आहे. "

" अहो, तें सारें खरें, पण आमचें पहिलें कर्ज कसें फिटणार ? "

" हें ऋण दिलें म्हणजे तें ऋण फिटल्यासारखें होईल ! "

" म्हणजे ? मी नाहीं समजलों. "

" मला प्रवासास लागणारे दीड हजार रुपये जर आपण कृपाळूपणें द्याल, तर अर्थात्च माझें मागचें दीड हजार रुपयांचें ऋण फिटलें असेंच मीं समजेन. "

ऋण फेडण्याचा हा उलटा प्रकार पाहून दयाळू महाराज हसले आणि म्हणाले " बरें आहे शिंदे, तुम्हीं यशस्वी होऊन या ! "

लगेच सेकंड क्लास डेकने जाण्यायेण्याचें भाडें देण्याची हुजूराज्ञा झाली.

ता. २१ सप्टेंबर १९०१ रोजीं विठ्ठलरावांनीं आपल्या मित्रांचा निरोप आणि आप्तांचा आशिर्वाद घेतला व एका बोटीनें इंग्लंडचा प्रवास सुरू केला. कोठे जमखंडी संस्थान व कोठे इंग्लंड !

जमखंडीहून पुण्यास विठ्ठलराव आले तेव्हां त्यांना तेथें एक नवेंच जग दिसलें, पण त्याच्यापेक्षां कितीतरी पटींनीं विशाल, सुंदर व संपन्न असें जग त्यांना इंग्लंडमध्यें गेल्यानंतर दिसलें. जिकडे पहावें तिकडे श्रीमंती, विद्वत्ता, समता, स्वच्छता, प्रामाणिकपणा व सेवाबुद्धि.

तेथील घरें काय, रस्ते काय, माणसें काय, आणि त्यांचे पोशाख काय, त्यांचें आचार–विचार काय? सारेच कांहीं एकदम निराळें आणि आगळें! इंद्राच्या नंदनवनांतच जणूं आपण पाय ठेवला आहे, असें विठ्ठलरावांना इंग्लंडांत गेल्याबर वाटलें.

इंग्लंडमधील ऑक्सफर्ड येथें दोन वर्षें ते राहिलें. "हीं दोन वर्षें म्हणजे माझ्या आयुष्यांतील एक मोठें सुख–स्वप्नच होय" असें ते नेहमीं म्हणत. या दोन वर्षांत त्यांनीं इंग्लंडशिवाय स्कॉटलंड, फ्रान्स, हॉलंड, जर्मनी, स्वित्झर्लंड, व इटली हे युरोपांतील सहा देशहि पाहिले. इंग्लंडच्या चिमकुल्या बेटांत त्यांना उद्योग व संतोष सर्वत्र आढळला. फ्रान्स मधील रंगेल पण समतेचे भोक्ते आणि कलेचे चाहते लोक पाहून त्यांना आनंद वाटला. हॉलंडमध्यें साधेपणा, स्वच्छपणा व टापटीप पाहून त्यांचें मन प्रसन्न झालें. जर्मनींतील कलोन.हें प्रार्थना मंदिर पाहून तर त्यांचें मन चकित झालें. आल्प्स पर्वतावरील एका सरोवराचे कांठीं असलेल्या गांवीं चार दिवस त्यांनीं विश्रांति घेतली. त्या पर्वताच्या एका शिखरावर ते फिरून आले. तें शिखर ७००० फूट उंच होतें तिकडे जातांना १० मैल लांबीच्या बोगद्यांतून आगगाडी जाते. इटली मध्यें रोम शहरीं त्यांनीं पांच दिवस घालविलें व पोपचें प्रत्यक्ष दर्शन घेतलें. खिस्ती लोकांच्या त्या जगद्गुरुनें आपल्या हातांतील अंगठी त्यांचेपुढें केली, तेव्हां त्यांनीं तिचें चुंबन घेतले. खिस्ती लोक पोपच्या चरणाचें चुंबन घेतात.

रोमच्या रोमरोमांत खिस्ती धर्म मुरलेला आहे. तेथें प्रार्थना मंदिरें अत्यंत भव्य आहेत. तीं सारीं विठ्ठलरावांनीं पाहिलीं. भारतांतील

मंदिरें व गोपुरें जशी प्राचीन व भव्य, तशींच तीं खिस्ती प्रार्थना-मंदिरें त्यांना वाटली. आणि तो मोझेसचा उंच पुतळा ! तो तयार करण्यास ४० वर्षे लागलीं ! तसाच दुसरा सेंट पॉलचा पुतळा ! "चित्रकलेंतील वैभवाला येथें नुसता पूर आला आहे," असें त्यांना वाटलें. व्हेसुवियस नांवाचा ज्वालामुखी धुमसत असलेला त्यांनीं आपल्या हॉटेलांतून पाहिला. ज्वालामुखीच्या तप्त रसाखालीं जळून-कोळपून—दडपून गेलेले पाँपीं हें शहर खणून काढलेले त्यांनीं पाहिलें. राखेच्या ढिगाऱ्याखालीं माणसें, जनावरें व इतर वस्तु ज्या सांपडल्या, त्यांचें हुबेहूब सांगाडे तेथील वस्तुसंग्रहालयामध्यें त्यांना दिसलें. दोन हजार वर्षांपूर्वींच्या त्या इमारतींच्या भिंतीवरचें रंग व चित्रें त्यांना अगदीं ताजी दिसलीं व साहजिकच आपल्या अजिंठ्याच्या लेण्यांतील रंगीत चित्रांची स्मृति झाली. जुन्या रोमन साम्राज्याच्या खुणा त्यांना जागोजाग आढळल्या.

इंग्लंडला जाण्याचा मुख्य हेतुहि त्यांनीं पुरेपूर साधला. ऑक्सफर्ड येथील मँचेस्टर कॉलेजांत सर्व धर्मांचा तौलनिक अभ्यास करणें हा त्यांचा हेतु होता. जगांतील नाना धर्मांचा विकास कसा झाला याचा अभ्यास करणें आणि त्यामुळें स्वतःची धर्म-बुद्धि शुद्ध करून घेणें व त्यायोगें आपली धर्म प्रचाराची तयारी करणें—या उद्देशानें ते तिकडे गेले होते. इंग्लंडांतील धर्म-प्रचारक तयार करण्यासाठींच 'मँचेस्टर कॉलेज' ही संस्था १७८६ सालीं स्थापन झाली. तेथें

...३

धर्म व शास्त्र या दोघांचाहि अभ्यास होई. तेथील "धर्म शास्त्रीय होता व शास्त्र धार्मिक होते."

हें कॉलेज केवढें होतें? त्यांतील विद्यार्थ्यांची संख्या फक्त १५-२० असे. ते बहुतेक बी. ए., एम. ए. झालेले असत. प्राध्यापक ५-६ च असत. लहानसें गुरुकुलच म्हणा ना! एका धार्मिक कुटुंबांतच राहिल्यासारखें समाधान विठ्ठलरावांना वाटलें. कॉलेजची इमारत नवी, सुंदर व प्रशस्त होती. तेथील पुस्तकालय अवाढव्य होतें; आणि उपासनालय गंभीर व पवित्र होतें. तेथें दर आठवड्याला प्रार्थनेसाठीं पुष्कळ लोक येत. दर रविवारीं तेथील प्राध्यापक उपासना चालवीत आणि दर बुधवारीं प्रत्येक विद्यार्थी उपासना चालवी व उपदेश करी. वर्षांतून एकदांतरी स्नेहसंम्मेलन होई.

अशा एका स्नेहसंमेलनांत विठ्ठलरावांनीं एक इंग्रजी निबंध वाचला "हिंदुस्तानांतील सामाजिक सुधारणेची जादू" हा त्याचा विषय. पण नुसता निबंध वाचून ते थांबले नाहींत. हिंदु लोकांची सामाजिक स्थिति कशी असते, हें प्रत्यक्ष दाखविण्याकरितां त्यांनीं नाटकासारखें देखावे तेथें उभे केलें. दुकानांतून हिंदी पोशाख व हिंदी दागिनें भाड्यानें आणून त्यांनीं तेथील तरुणांना व तरुणींना हिंदी पेहराव चढविले. एका कोपऱ्यांत नववधू बसली होती, तर दुसऱ्या कोपऱ्यांत तिचा पति परिक्षेचा अभ्यास करीत होता. वडील माणूस येतांच तीं दोघें त्याला हिंदु पद्धतीनें नमस्कार करीत. हजारों शब्दांनीं होणार नाहीं इतका परिणाम ह्या दृश्यानें झाला. हिंदूंच्या चालीरीति त्या

युरोपियन प्रेक्षकांच्या चित्तावर चांगल्याच ठसल्या. या नाट्यप्रयोगाची प्रशंसा एका फ्रेंच वर्तमानपत्रानेंहि केली.

सकाळीं १० पासून दोन प्रहरीं १ पर्यंत तीनच तास कॉलेजचीं व्याख्यानें असत. झालींच तर संध्याकाळीं जाहीर व्याख्यानें असत. रात्रींच्या वेळीं क्लबाच्या सभा – संमेलनें चालत. वर्षांतून सहा सहा महिने सुट्टी असे. आठवड्यांतून चार दिवस कॉलेज व तीन दिवस सुट्टया असत. या अभ्यासांत विठ्ठलराव मनापासून भाग घेत. पण तेथील विद्यार्थ्यांच्या खोडकरपणांत किंवा व्यसनांत ते मुळींच सामील होत नसत. सिगारेट न ओढणारे तेच एकटे विद्यार्थी त्या कॉलेजांत होते. वात्रटपणा व उनाडपणा यांच्यापासून ते दूर असत. त्यामुळें त्यांना " सालस हिंदी " असें नांव पडलें होतें.

त्यांचा हा दुबळेपणा घालविण्यासाठीं एकदां कांहीं डुच विद्यार्थ्यांनीं त्यांना धरलें, उचललें, आणि टेबलावर आडवें ठेवलें व गाणें गात ते त्यांना घाण्यासारखें फिरवूं लागले. विठ्ठलराव आपला आवडता पिवळा फेटा बांधून कॉलेजांत केव्हां केव्हां जात. तेव्हां त्या फेट्याचा शेमला एका विद्यार्थ्यानें ओढला. अशा खोड्या विठ्ठलराव स्वतः करीत नसत आणि दुसऱ्यानें केल्या तरी ते त्यांचेवर रागवत नसत.

ते सदैव शांत वृत्तीनें रहात आणि मिळेल तेथून ज्ञान संपादन करीत. विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यांत ते चांगलें मिसळत आणि निरनिराळ्या धर्मांची माहिती करून घेत. केवळ पुस्तकी अभ्यासावर ते भर देत नसत. सर्वांशीं हसून–खेळून ते वागत. त्यामुळें त्यांचे-

विषयीं त्या युरोपियन विद्यार्थ्यांचें मत चांगलें बनलें. एका हस्तलिखित वृत्तपत्रांत विद्यार्थ्यांनीं आपल्या मित्रांची व गुरूंची विनोदी शब्दचित्रें काव्यरूपानें रंगविलीं होतीं. त्यांत विठ्ठलरावांचें वर्णन असें केलें होतें.—

A meek and modest Indian
Who will, unless he faints,
Some day duly be worshipped
Among his country saints.

अशा रीतीनें ज्ञान व प्रेम यांचें गांठोडें पाठीशीं बांधून विठ्ठलराव ~~इंग्लंडहून~~ २१ ऑगस्ट १९०३ रोजीं परत निघाले. वाटेंत हॉलंडची राजधानी ॲम्स्टरडॅम येथें एक ‘ जागतिक धर्म परिषद ’ होती. तिला ते हजर राहिले. धार्मिक व्याख्यानें व उपासना यांची एकच गर्दी उसळली होती. “ हिंदुस्थानातील उदार धर्म ” या विषयावर विठ्ठलरावांनीं एक निबंध वाचला. तो त्या परिषदेच्या पुस्तकांत प्रसिद्ध झाला. त्या परिषदेंत धर्म विचारांचें विपुल धन विठ्ठलरावांना लुटतां आलें.

आपली ही ‘ यात्रा ’ पुरी करून विठ्ठलराव ता. ६ ऑक्टोंबर रोजीं मुंबईला येऊन पोहोंचले. तेथें त्यांचें स्वागत प्रार्थना-समाजिस्टांनीं चांगलेंच केलें. डॉ. भांडारकर, न्या. चंदावरकर वगैरे थोर थोर माणसांनीं त्यांच्या स्वागतपर भाषणें केलीं. त्या वेळीं विठ्ठलरावांच्या स्वागतार्थ पुढील गौरवाचें गीत गाण्यांत आले—

तरुण असतां स्वार्थत्यागी तुम्हीं दिसतां भले ।
प्रभुवर कृपें धर्माभ्यासीं तुम्हां यश लाभलें ॥
तरि तुमचिया हस्तें धर्म-प्रचार बरा घडो ।
तनुमन तसें देवापायीं सदा तुमचें जडो ॥ १ ॥

◆ ◆ ◆



# चार

विलायतेहून आल्यावर दुसऱ्याच महिन्यांत विठ्ठलरावांना मुंबईच्या प्रार्थना-समाजानें आपलें प्रचारक नेमलें

हा प्रचार कशाचा ? धर्माचा !

कोणत्या धर्माचा ?

हिंदुधर्म त्यांना प्रिय होता, पण त्यांतील जातीभेद त्यांना मान्य नव्हता. तुकारामादि संत त्यांना पूज्य वाटत, पण मूर्तिपूजा त्यांना आवडत नसे. बरें, पाश्चात्यांच्या ख्रिस्ती धर्माची भुरळ तरी त्यांच्या चित्तावर पडली होती काय ? छे: ! "पाश्चात्य संस्कृतीच्या घमेंडखोर पोकळपणाचा जवळ जवळ मला वीट आला होता !" अशी स्पष्ट कबुली त्यांनीं दिली आहे.

सर्व धर्मांतील चांगला भाग--आपल्या बुद्धीला पटणारा व समाजाला हितकारक असणारा असा भागच--शिंदे यांना संमत होता

आणि त्याचाच प्रचार सर्व भारतभर करण्याचें कार्य त्यांनीं आपल्या शिरावर घेतलें. निरनिराळ्या धर्मांचा समन्वय प्रार्थनासमाजानें आपल्या तत्त्वज्ञानांत जसा केला, तसा आपल्या प्रचाराच्या पद्धतीतहि भिन्न भिन्न धर्मप्रचारकांचे मार्ग समाविष्ट केले. "मुसलमानांची पद्धति लोकसत्तात्मक तर ख्रिस्ती पद्धति मेंढपाळासारखी आणि बौद्धांची वृत्ति निःसंग उदासीन." हिंदूमध्यें जातिभेदाचा बुजबुजाट फार. त्यामुळें प्रचाराच्या पद्धतीहि अनेक. या सर्व पद्धतींचें सार निवडून शिंदे यांनीं आपली प्रचार-पद्धति ठरविली. ख्रिस्ती मिशनऱ्यांची सेवा, सहानुभूति व व्यावहारिकता हे गुण त्यांनीं उचलले.



राजा राममोहन रॉय

त्या वेळीं देशांतील पुढाऱ्यांमध्यें दोन प्रवाह होते. राजकारणांत जहाल असणारे 'राष्ट्रीय' पुढारी धार्मिक व सामाजिक बाबतींत मंद गतीनें चालणारे होते; तर राजकारणांत मंद गतीनें व नेमस्त वृत्तीनें वागणारे 'प्रागतिक' हे धर्म-सुधारणा व समाज—सुधारणा यांमध्यें तीव्रतेची भाषा बोलत. या दोन प्रवृत्तींचें शब्द-चित्र शिंदे यांनीं एका रूपकाचें द्वारें सुंदर काढलें आहे; तें असें:—

"गंगा व यमुना ह्या दोन्ही नद्यांचा उगम हिमालयांत आहे. पण त्या मोठ्या प्रदेशावरून एकमेकापासून अलग वाहत येऊन प्रयाग येथें पुन: एकत्र होतात. तोच प्रकार आमच्या भारतीय चळवळीचा झाला आहे. ह्या दृष्टीनें पाहतां **राजा राममोहन रॉय** हे हिमाचलाप्रमाणें आणि **महात्मा गांधी** हे प्रयागाप्रमाणें भारतीय इतिहासांत अखंड शोभत राहतील. राष्ट्रीयतेची यमुना आणि प्रागतिकतेची गंगा ही राजा राममोहन रॉयच्या चरणापासून निघून महात्माजींच्या अंजळीमध्यें पुन: एक झाल्या आहेत. हें किती गोड दृश्य!"



महात्मा गांधी

अशा समन्वयी व सारग्राही भूमिकेवरून शिंदे प्रचार करूं लागले. त्या वर्षी काँग्रेसचें अधिवेशन मद्रास येथें नाताळमध्यें भरणार होतें. म्हणून ते तिकडे निघालें. वाटेंत बेळगांव येथें उतरून त्यांनीं धर्मांच्या तौलनिक स्वरूपावर व्याख्यान दिलें. त्यानंतर बंगलोर येथें त्यांनीं द्राविडी संस्कृति पाहिली. शेवटीं ते मद्रासला गेलें. तेथें काँग्रेसबरोबरच 'सामाजिक परिषद' भरणार होती, त्याचप्रमाणें ब्राह्मसमाजाची एकेश्वरी धर्माची परिषदहि होणार होती. त्यामुळें थोर थोर ब्राह्मबंधूंच्या गांठी भेटी शिंदे ह्यांना घेतां आल्या. नंतर ते बंगालकडे वळले.

वाटेंत आंध्र व ओरिसा ह्या प्रांतांत त्यांनी दौरा केला. प्रत्येक ठिकाणीं ते ब्राह्मसमाजाच्या कार्याचें निरीक्षण करीत असत.

आंध्र आणि ओरिसा यांच्या सीमेवर जगन्नाथपुरी हें धर्मक्षेत्र आहे. तेथें शिंदे गेले. तेथील मंदीरांतील घाणेरडेपणा पाहून त्यांचें मन उबगून गेलें. तेव्हां ते समुद्र-किनाऱ्यावर जाऊन विशाल वाळवंटावर शांतपणें बसलें. वर विशाल आकाश आणि खालीं तितकाच विशाल समुद्र ! तें भव्य सृष्टिसौंदर्य पाहून शिंदे मनांत म्हणाले, "जगाचा खरा नाथ येथें आहे."

शिंदे १९०४ च्या जानेवारींत कलकत्ता येथें गेलें. त्या वेळीं तेथें 'माघोत्सव' चालू होता. हा उत्सव बंगालमध्यें ब्राह्मसमाज मोठ्या उत्साहानें साजरा करीत असतो. "बंगाल म्हणजें ब्राह्म धर्माचें सरोवर आहे, त्यांतील पाणी कालव्यानें काढून अखिल भारतावर बागाईत करावयाची आहे आणि त्या कार्याचें आपण एक पाईक आहोंत." अशी कल्पना शिंदे यांच्या मनांत चमकून गेलीं.

ता. २४ जानेवारी हा ब्राह्म समाजाच्या स्थापनेचा दिवस. त्यासाठीं बंगाल्यांतील लहान-थोर ब्राह्म कुटुंबें आलीं होतीं. त्यामुळें व्याख्यानें व भजनें यांची गर्दी उसळली होती. मुख्य दिवशीं पहाटें ३ वाजल्यापासून भजनाला प्रारंभ झाला. भजन तीन तास झालें. नंतर एक तास उद्बोधन, एक तास प्रार्थना आणि दोन तास प्रवचन अशी सात तास उपासना चालू होती. ती ऐकण्यासाठीं

... ठाणे. ...
... वि: ...
... नों. दि. ...

दोन्हीं मजल्यावर चिक्कार गर्दी जमली होती. त्यांत शिंदेहि होतें. " भक्तिरसाचा पूर वाहिला " असा अनुभव त्यांना आला.



डॉ. रविंद्रनाथ टागोर

असाच एक दिव्य अनुभव ता. ३० जानेवारीला त्यांना आला. त्या दिवशीं त्यांना महर्षि देवेंद्रनाथ यांचें दर्शन घडलें. ब्राह्मसमाजांतील तीन प्रमुख विभूतिपैकीं ते एक. त्यांचे पुत्र म्हणजेच **डॉ. रविंद्रनाथ टागोर.** मुंबई प्रांतांत समाजाचें कार्य शिंदे करीत आहेत, हें ऐकून महर्षींना आनंद वाटला, गहिंवर आला आणि त्यांनीं शिंदे ह्यांच्या अंगावरून हात फिरविला. महर्षींचा हा आशीर्वादच आपल्याला लाभला असें शिंदे ह्यांना वाटलें.

त्याचप्रमाणें प्रतापचंद्र मुजुमदार यांचेंहि दर्शन शिंदे यांना घडलें. त्यांचें इंग्रजी भाषेवर मोठें प्रभुत्व होतें. भव्य कपाळ, पाणीदार डोळें, पांढरी-शुभ्र दाढी आणि अंगावर शुभ्र लोकरी शाल अशा थाटांत त्यांनीं इंग्रजींतून जी प्रार्थना केली, ती " आत्म्याला हलवून जागी करणारी होती ".

अशा सात्त्विक आनंदाचे घुटके घेत असतांनाच शिंदे यांना एक तामसी दृश्य दृष्टीस पडलें. देव-माणसांच्या दर्शनानंतर राक्षसी कृत्य त्यांच्या डोळ्यांना दिसलें. भक्ति-रसानंतर रौद्र-रसाचा अनुभव त्यांना

आला, आणि तोहि कोठें? तर काली मातेच्या मंदिरांत. त्या मंदिराच्या अंगणातच, भर दिवसा, तेथील पुजारी शेळ्या-मेंढयांची कत्तल करतात! त्यांच्या लाल रक्ताचें पाट देवळांत वहात असतात. सबंध अंगणभर रक्तामांसांचा चिखल सांचलेला! चार रेडयांची प्रेतें हीं तेथें पडलेलीं! तें सारें भेसूर स्वरूप पाहून शिंदे ह्यांच्या अंगावर कांटा उभा राहिला. हिंदु धर्माची ही विटंबना आहे असें त्यांना वाटलें. "हे देवाचे पवित्र मंदिर आहे कीं हिंस्र कत्तलखाना आहे?" हेंच त्यांना कळेना. त्यांना अत्यंत उद्वेग वाटला. स्वामी रामकृष्ण-परमहंसापासून महात्मा गांधीपर्यंत सर्व करुणा-मूर्तींना निषिद्ध वाटलेला हा पापी प्रकार धर्माच्या नांवाखालीं अद्याप चालू आहे!

ब्राह्मसमाजाच्या उत्सवांतील ज्ञान, भक्ति व प्रेम यांची अपार संपत्ति लुटून ते आनंदानें मुंबईस परत आले.

अशा दौऱ्यांत शिंदे यांना कधीं सुख, तर कधीं दुःख अनुभवावें लागे. कांहीं लाभ, तर कांहीं हानि; कांहीं प्रकाश, तर कांहीं छाया; कोठें कांटेसराटे, तर कोठें गुलाबाच्या पायघड्या—असे उलटसुलट अनुभव शिंदे यांना येत गेले. क्वचित् राजेशाही पाहुणचार, तर क्वचित् विरोधाचा भडिमार—असेहि दोन टोकांचे प्रकार घडले.

खुद्द जमखिंडीचीच गोष्ट घ्या ना. ते त्यांचें जन्मगांव. तेथें त्यांच्या शिक्षणाविषयीं कोण कौतुक! पण तेथें ते जाति-भेदाविषयीं आपले नवे विचार सांगूं लागले मात्र, तों त्यांचेविरुद्ध काहूर उठलें—एका सनातनी शिक्षकाला वाटलें, हा आपल्या धर्मावरच हल्ला आहे. तो

परतवून लावण्यासाठीं त्यानें शाळेंतील मुलें गोळा केलीं. त्या वानर-सेनेनें शिंदे यांच्या व्याख्यानाचे वेळीं गडबड—गोंधळ—गोंगाट केला. एवढेंच नव्हे तर, रस्त्यावरील कचरा व दगडधोंडे यांचाहि मारा सुरू केला.

असाच दुसरा अनुभव शिंदे यांना गुजरातेंत आला. एके दिवशीं दुपारीं बारा वाजतां ते मियागांव या लहानशा स्टेशनवर उतरले. तेथें ना खाण्याची, ना पिण्याची सोय. आधीं दीड दिवस प्रवासांत उपास घडलेला. तेव्हां स्टेशनवरच ट्रंक व बिस्तरा टाकून ते कोठें कांहीं खावयास मिळतें कां, हें पहाण्यास निघाले. अर्ध्याच मैलावर एक खेडें लागलें. ते खेडें कसलें? ओसाड-भकास. एका ब्राह्मणाच्या घरांत श्राद्धाची तयारी चालली होती, तेथें या अब्राह्मणाला पाय ठेवून कोण देतो?

मग शिंदे एका शिंप्याचे दुकानीं गेले. त्याची बायको शेवाळलेल्या घाणेरड्या पाण्याचा घडा डोकीवर घेऊन घरीं आली. तिनें एका पितळींत शिळा भात व वाडग्यांत कढी दिली. कढींत माशा पडलेल्या! त्या काढून कढीबरोबर भाताचे गोळे शिंदे यांनीं घशाखालीं घातले. पण पाणी कांहीं पिववेना. तसेच ते घरांतून ओटीवर आले—चटईवर पडले तों झोंप लागली. उठल्यावर तहान लागली. तसलेंच तें पाणी ते प्याले—चटईवर बसून.

त्या चटईवर एक मुसलमान गृहस्थ बसला होता. शिंदे यांच्याजवळ जातिभेद नव्हता—तसाच धर्मभेदहि नव्हता—केवळ मानवतावाद होता.

मानव तेवढा समान, असें ते मानीत. पण शिंपी म्हणजे शिंदे नव्हे. त्याला हा अधर्म वाटला. त्याचे डोळे लाल झाले. शिंप्यानें शिंद्यांना लगेच दुकानांतून बाहेर काढलें.

शिंदे निघाले—त्याबरोबर तो मुसलमानहि निघाला. तो होता पोलीस. त्यानें शिंद्यांना आपल्या फौजदारांचे घरीं नेलें. त्यांचें सामान त्यानें आपल्या डोक्यावरून स्वतः त्या घरीं पोंचविलें. ते फौजदार कोल्हापूरचे—शिंदे यांच्या परिचयाचे. त्यांनीं शिंदे यांची चांगली बडदास्त ठेवली.

दुसरें दिवशीं मियागांवच्या ठाकूरांना फौजदारानें शिंदे आल्याची वर्दी दिली. लगेच देखावा पालटला. ठाकुरांनीं आपली सुंदर गाडी पाठविली. तींतून शिंदे मियागांवला गेले. तेथें त्यांचा थाटाचा पाहुणचार झाला. प्रार्थनासमाजाचा प्रचार झाला.

पंढरपूरचा अनुभव तर फारच मौजेचा. तेथील हायस्कूलांत मुख्याध्यापकानें शिंदे यांचें व्याख्यान ठेवलें. त्यांचेबरोबर स्वात्मानंदजी होते. त्यांचेंहि व्याख्यान त्या हेडमास्तरांनीं ठेवलें. पण व्याख्यानाचें वेळीं काय दिसलें? एकहि विद्यार्थी हजर नाहीं! केवळ रिकामीं बाकें! पण निराश होईल तर तो प्रचारक कसला? स्वात्मानंदजी म्हणाले, ‘शिंदेजी, आज मीं व्याख्यान देतों— तुम्हीं ऐका, उद्यां तुम्हीं वक्ते नि मी श्रोता.’ आणि प्रत्यक्षांत घडलेंहि तसेंच.

बडोद्याचा प्रसंग तर फारच न्यारा. तेथें शिंदे गेले, तेव्हां मराठेमंडळींनीं त्यांचें स्वागत केले—पानसुपारीचा जाहीर समारंभहि

केला. पण समारंभांत जीं भाषणें झालीं, त्या सर्वांचा सूर असा कीं, "शिंदे यांच्या शिक्षणाचा सारा खर्च महाराजांनीं व मराठा समाजानें केला; असें असतां बडोद्याची नोकरी किंवा मराठ्यांची सेवा न करतां शिंदे प्रार्थनासमाजाचे प्रचारक बनले, हें ठीक नाहीं.' अशी पुष्पांजली वाहिल्यावर शिंदे यांच्या गळ्यांत हार घालण्यास ते पुढें झाले. तेव्हां तो हार घेण्याचें शिंदे यांनीं नाकारलें व म्हटलें, " स्वत: महाराज हेच जर केवळ मराठ्याकरितां नाहींत, तर त्यांचा अनुयायी मी निराळा कसा होऊं ? प्रार्थनासमाज सर्वांसाठीं आहे. "

मंगळूर येथें शिंदे यांचा सत्कार चांगला झाला. तेथील बिल्लव मंडळी अस्पृश्यासारखीच. त्यांनीं शिंदे यांची सोय एका बंगल्यांत केली होती. ते यांना गुरु मानीत. नरसाप्पा व नारायणाप्पा दोघां बंधूंनीं त्यांच्या पाहुणचाराची सारी जबाबदारी उचलली होती. त्यांची गुरु-भक्ति कांहीं विलक्षणच ! तिचा प्रसाद खुद्द शिंदे यांनाहि खरपूस मिळाला.

पहांटे पांच वाजण्याची वेळ ! बंगल्यांत सर्वत्र अंधार. चोहोंकडे सामसूम. इतक्यांत शिंदे यांना, बिछान्यावर पडल्या पडल्या, कांहीं कुजबूज ऐकूं आली. नंतर कडाकडीचें भांडण कानीं पडूं लागलें, तेव्हां काय प्रकार आहे, तो पहावा म्हणून शिंदे खोलीबाहेर पडले— तर त्या दोघा भावांची मारामारी चाललेली ! ती सोडविण्यासाठीं शिंदे पुढें सरसावले. पण त्या मल्ल-युद्धांत त्यांची पाठ चांगलीच तिंबून निघाली !

[library stamp]

त्या भांडणाचें कारण काय? तर 'आजचा स्वयंपाक कोणीं करावा?' प्रत्येकाचा हट्ट, स्वतः करण्याचा त्यावरून तीं सोर्टी बाचाबाची व मारामारी! त्या गुरु-भक्तीचा प्रसाद म्हणजे शिंदे यांच्या पाठीवर वळ उठले. ते पाहून ते दोघे भाऊ लहान मुलांसारखे स्फुंदून स्फुंदून रडूं लागले. केवढी ही भोळी भक्ति.

कोल्हापूर येथें शिंदे यांना एक विलक्षण योग आला. तो म्हणजे तेथील श्रीशंकराचार्यांनीं आपल्या मठांत त्यांचें कीर्तन करविलें, स्वतः ऐकलें आणि समाप्तिनंतर नारळ–धोतरजोडी देऊन त्यांची संभावना केली. त्या काळांत श्रींचें हें एक क्रांतिकारक कृत्यच होतें. कारण शिंदे हे प्रार्थनासमाजिस्ट–सुधारक–नवे विचार मांडणारे–जातिबद्ध धर्माविरुद्ध बंड करणारे! त्यांच्या वडिलांनीं पनवेल येथें असतांना एका लष्करी पेन्शनरला आपल्या घरीं चहास बोलावलें, म्हणून त्यांचेवर गांवगंगेनें बहिष्कार घातला–घरची मोलकरीण काम सोडून गेली आणि वडिलांना हजामतीची पंचाईत पडली. आणि कोल्हापूरला तर साक्षात् श्रीशंकराचार्यांनींच शिंदे यांची सत्कार पूर्वक संभावना केली.

भारतांतील ईश्वरनिष्ठ मानवांचा मेळावा भरविणें हें ब्राह्मधर्माचें एक अंग होतें. त्यासाठीं अ. भा. "एकेश्वरी धर्मपरिषद" भरविली जात असे. तिचें कार्यवाह म्हणून शिंदे यांनीं जोरानें व जोमानें काम केलें आणि त्या परिषदेंत जीव ओतला. मुंबई, काशी, कलकत्ता, सुरत, मद्रास आणि लाहोर या सहा शहरांत १९०४ सालापासून दरवर्षी त्यांनीं नियमानें परिषदा भरविल्या. त्यासाठीं त्यांना त्या त्या शहरांत व प्रांतांत प्रवास करावा लागला. या कार्याच्या निमित्तानें

१९०४ ते १९१३ या ९ वर्षांत त्यांनीं जवळ-जवळ सर्व भारतभर प्रवास केला. बिहारनंतर—कुचबिहार त्यांनीं 'पादाक्रांत' केला. बांळिपूर, मोंघेर, भागलपूर, डाका, बारिसाल, सुरत, मद्रास, लाहोर, कराची, अलाहाबाद अशा दूर-दूरच्या ठिकाणीं त्यांनीं मजल मारली आणि अंग मोडून काम करून आपलें धर्मप्रचाराचें कार्य नेटानें व निष्ठेनें पार पाडलें.

अशा दौऱ्यामध्यें एकदां त्यांना ब्रह्मपुत्रा नदीच्या कांठीं जावें लागलें. त्यावेळचा आनंद त्यांनी पुढील शब्दांनीं वर्णिला आहे, "साक्षांत ब्रह्मपुत्रेनें मला आपले विराट दर्शन दिलें. 'मृत्योर्मा अमृतं गमय' असें मनांत येतें न येतें तोंच अमृताची पताकाच माझ्यापुढें फडकूं लागली. हिमालयाच्या पलिकडे कैलास पर्वताच्या पूर्व पायथ्याशीं असलेल्या मानससरोवरांतून निघून पित्यास प्रदक्षिणा घालून आलेली ही महाभाग ब्रह्मपुत्रा! हिनें केवळ दर्शनहेळामात्रेंकरून किती दिवसांची वार्ता सांगितली! किती काळाची साक्ष दिली!"

असे कडू-गोड अनुभव चाखीत, शिंदे आपले धर्म-कार्य नेटानें व जोमानें चालवीत होते. तें कार्य दोन प्रकारचें होतें—१ आचारकार्य २ प्रचारकार्य. जे प्रार्थनासमाजाचे सभासद झालेले असतील, त्यांचेसाठीं साप्ताहिक उपासना चालविणें, घरोघरीं भेटी देऊन कौटुंबिक धर्माचरणावर लक्ष ठेवणें, स्नेह-संमेलनें भरविणें, अपंगांची शुश्रूषा करणें, अस्पृश्यासाठीं व मजुरासाठीं शाळा चालविणें, दर शनिवारीं स्त्रियांसाठीं आर्य महिला समाज चालविणें, दर रविवारीं मुलांसाठीं

धर्म-नीतीचे वर्ग सुरू करणें, तरुणांसाठीं ' तरुण ब्राह्ममंडळें ' काढणें, वृद्धांसाठीं ' संगत-सभा ' चालविणें हें पहिल्या प्रकारचें कार्य चाले. त्यांतच ' ब्राह्म पोस्टल मिशन ' नांवाची संस्था काढून शिंदे यांनीं आठ वर्षांत ३४३८ ब्राह्मधर्मावरील पुस्तकें व १२७०० पत्रकें व शेंकडों इतर पुस्तकें बहुशः फुकट वाटलीं. तीं टपालानें लोकांस वाटून वाचकांकडून येणाऱ्या प्रश्नांना उत्तरें दिलीं जात—जरूर तेव्हां वाचकांच्या भेटीहि घेतल्या जात. पंढरपुरांत प्रार्थनासमाजानें ' बाल-हत्या-प्रतिबंधक गृह ' चालविलें होतें. शिवाय ' समाजा'चें मुखपत्र ' सुबोधपत्रिका ' चालविण्यांतहि शिंदे यांना भाग घ्यावा लागे.

दुसरें कार्य धर्म प्रचाराचें. तें अखंड चालू असे. महाराष्ट्रांत व गुजरातेंत शिंदे जात; शहरें व खेडीं पालथीं घालीत. अहमदाबाद, राजकोट, भावनगर, जुनागड या प्रदेशांकडे त्यांचा दौरा कधीं जाई, तर कधीं ठाणे, नाशिक, नगर, बारामती, सोलापूर, विजापूर, हुबळी, धारवाड, बेळगांव इत्यादि टापू ते आपल्या पायाखालीं घालीत. कधीं इंदूर—बडोदे—कोल्हापूर अशा संस्थानांवर ते आपल्या विचारांचें सिंचन करीत; तर कधीं अलिबाग, मालवण, सांवतवाडी, गोवें, इत्यादि कोंकण—भागांत ते दौड मारीत. कोठें आगगाडी, तर कोठें बैलगाडी, तर कोठें पायींच ! कैक वेळां फाके पडत,—' खावयास उन्हाशिवाय कांहींच ' नसावयाचें.

अशा रीतीनें, उन्हापावसांत, वादाविरोधांतून, शिंदे यांच्या

प्रचाराचें गलबत सतत सात वर्षें चालू होतें. या काळांत त्यांना दरमहा ६० रुपये पगार मिळे. तेवढ्यांत मोठा प्रपंच, पाहुण्यांचा राबता, प्रवासांतील वाढता खर्च--हें सारें भागवावयाचें. पण त्याकडे त्यांचें लक्षच नसे.

ध्येयाची धुंदी, कार्याचा कैफ, सेवेची समाधि— यापुढें सारीं पार्थिव विघ्नें तृणवत् होत !

◆ ◆ ◆


दलितांची सेवा

# पांच

ती अमावस्येची रात्र! पण तिनें आण्णासाहेब शिंदे यांच्या अंतःकरणांत नव्या कार्याची पौर्णिमा फुलविली!!

१९०५ साल. ते उन्हाळ्याचें दिवस. अहमदनगर येथील प्रार्थना-समाजाच्या उत्सवासाठीं आण्णा तेथें गेले होते. सकाळपासून उत्सवाच्या कामांत ते गर्क होते. खूप दगदग; त्यामुळें ते दमून-थकून गेले होते. रात्रीं त्यांनीं आपलें शिणलेलें शरीर अंथरुणावर टाकलें. पण त्यांना विश्रांति कोठली?

रात्रीं १२ वाजतां अण्णांचा शोध करीत, त्यांना हांका मारीत, कांहीं माणसें तेथें आलीं. आण्णासाहेब लगेच अंथरुणावर उठून बसले. त्यांनीं चौकशी केली. तेव्हां अस्पृश्य वर्गाचें एक शिष्टमंडळ आपल्या भेटीस आल्याचें त्यांना कळलें. नगरपासून चार मैलांवर भिंगार नांवाचें एक खेडें आहे. तेथील अस्पृश्यांनीं जाहीर सभा बोलावली होती.

आण्णांच्या अपमानाची वार्ता त्यांना कळली होती. त्यांनीं आपल्या सभेस अध्यक्ष म्हणून यावें अशी त्यांना फार इच्छा. म्हणून त्यांनीं आपले चार-पांच बोलके म्होरके आण्णाकडे पाठविले होते. त्यांचें तें शिष्टमंडळ.

दिवसभराच्या दगदगीनें व वाटाघाटीनें त्यांचें शरीर 'नको' म्हणत होतें; पण समाजसेवेस आतुरलेलें त्यांचें मन 'चला' असें सांगत होतें. अखेर मनानें शरीरावर मात केली आणि आण्णांनीं त्या शिष्टमंडळाला 'होय' म्हटलें.

ते टांग्यांत बसले व निघाले. भिंगारगांव जवळ येऊं लागलें, तसतसें पेटलेले हिलाळ दिसूं लागले. सभेचा गोंगाटहि ऐकूं येऊं लागला. गांवाच्या हद्दीवर महारवाड्यांत ते उतरले. सभेस गेले तों काय? स्त्रिया व पुरुष, मुलें व म्हातारें यांची खूप गर्दी जमलेली. आण्णा दिसतांच सगळ्यांनीं टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. आण्णांनीं त्या समाजावर एकवार नजर फिरविली आणि त्यांचें हृदय एकदम कळवळलें. दिवसभर मरमेरतों काम करून हीं गरीब बिचारीं माणसें ऐन मध्यरात्रीं एकत्र जमलीं आहेत, हें त्यांनीं ओळखलें.

अस्पृश्य समाजाचा इतिहास—त्याचें अठराविश्वें दारिद्र्य, त्याला सोसाव्या लागणाऱ्या यातना, अपमान, छळ—या सर्वांचें ज्ञान त्यांना पुस्तकांतून भरपूर झालेलें होतें. पण आतां त्यांना त्याचें साक्षात् दर्शन होत होतें. कारल्याचा कडवटपणा व विस्तवाचा दाहकपणा कितीहि ऐकला-वाचला, तरी प्रत्यक्ष अनुभवाचा परिणाम कांहीं निराळाच.

तसा अस्पृश्यतेचा कडवटपणा व दाहकपणा, त्या सभेकडे पहातांच, आण्णांना नव्यानेंच जाणवला.

सभा सुरूं झाली. एक दोन भाषणें झालीं. नंतर नागपूरच्या एका संस्थेकडून आलेलें एक पत्रक वाचावयाचें होतें; तें कोणी वाचावें ?

आण्णांनीं. तशी विनंति त्यांना करण्यांत आली. ती त्यांनीं तात्काळ मान्य केली. तें पत्रक हातांत घेऊन, आपल्या खणखणीत वाणीनें, ते वाचूं लागले. प्रथमच त्या पत्रकांत संस्थेच्या कार्याचा उद्देश लिहिलेला; तो असा–

'हजारों वर्षे वरच्या जातीचा जुलूम सहन करूनहि वरिष्ठ वर्गांचीं मनें विनाकारण न दुखवितां, किंबहुना कोणत्याहि प्रकारें त्यांच्या वाटेस न जातां, अस्पृश्य वर्गांनीं आपल्या स्वतःच्या हिताचे प्रयत्न करावें.'

पत्रकांतील ते शब्द वाचतां वाचतां त्यांच्या मनांत विचारांचें चक्र सुरूं झालें. त्यांच्या हृदयाची पाकळीन् पाकळी उमलूं लागली.

"जनांसि काय सांगणें। मनासि सर्व सांगणें॥"

असे वारें त्यांच्या चित्तांत वाहूं लागलें. अशा दीन-हीन व दलित-पीडित बांधवांच्या उद्धारासाठीं आपण आपला जन्म वाहिला पाहिजे, असें विचार त्यांच्या मनांत येऊं लागले. मानवजातीचा केवढा मोठा अंश मानवतेला पारखा करण्यांत आला आहे, हें लक्षांत येऊन त्यांचें हृदय कळवळलें. आणि–

" इतर सर्व कामें टाकून, एका घडीचाहि वेळ न दवडतां, ह्या कार्यास लागावें, असा संकल्प परमेश्वराला स्मरून " त्यांनीं त्याच रात्रीं केला. मूढबुद्धि व अत्याचार यांपासून आपण आपलें अस्पृश्योद्धाराचें कार्य अलिप्त ठेवण्याची प्रतिज्ञाहि त्यांनीं त्याच वेळीं केली. आणि—

दिवाळीचा पाडवा ! ता. १८ ऑक्टोबर १९०६ या दिवशीं सकाळीं ९ वाजतां मुंबई येथें आण्णांनीं " भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळ " ( ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस् मिशन ) स्थापन केलें. त्यासाठीं प्रार्थना-समाजाच्या एका उपाध्यक्षांनीं १००० रुपयांची देणगी त्यांना दिली. या मंडळाचे अध्यक्ष न्या. चंदावरकर असून कार्यवाह आण्णासाहेब हे होते.

आतांपर्यंत प्रार्थना-समाजाचें प्रचारकार्य आण्णांनीं केलें होतें; मुख्यतः मोठमोठ्या शहरांतून व बड्या-बड्या श्रीमंतामध्यें व विद्वानांमध्यें. सत्ता, संपत्ति, विद्वत्ता व मान-सन्मान यांची रेलचेल असूनहि ज्यांचें मन शांत नसेल, ज्यांच्या हृदयाला अध्यात्माची भूक लागलेली असेल; त्यांना शाश्वत शांति देणाऱ्या धर्माचें ज्ञान देणें हेच त्यांचें प्रधान-कार्य होतें.

पण आतां विषय निराळा, क्षेत्र निराळें व कार्याचें स्वरूपहि निराळें. हिंदुसमाजांत अस्पृश्यतेची भावना हजारोंहजार वर्षें भिनलेली—मुरलेली. ती दूर करणें महाकर्मकठीण. भगीरथ प्रयत्नच व्हावयास पाहिजेत त्यासाठीं. भगवान बुद्धासारखा लोकोत्तर पुरुष त्यासाठीं यावयास हवा. याची जाणीव आण्णांना पूर्णपणें होती. ते म्हणत—

" अस्पृश्यतानिवारण हें मोठें जागतिक कार्य. खंडवजा भारतासारख्या देश-समूहावर ह्या कार्याचा प्रयोग करणें हें कांहीं लहानसहान कृत्य नव्हे. कार्य मोठें, पण कार्यवाह लहान. पण विभूतीची वाट पहात बसण्याला अवसर कोठून आणणार ?"

कार्यवाह लहान खरा, पण त्याची आपल्या कार्यावर श्रद्धा महान. " श्रद्धेनें पर्वत हालतात ", हें येशू ख्रिस्ताचें वचन त्यांच्या डोळ्यांपुढें सदैव असे. आणि " श्रद्धावान् लभते ज्ञानम् " हें श्रीकृष्णाचें वचन त्यांच्या अंत:करणांत नित्य घोळत असे. या श्रद्धेच्या बळावर आण्णांनीं प्रचंड कार्य केलें.

त्यांच्या कार्याच्या पद्धति दोन— ( १ ) सुवर्णकार पद्धति, ( २ ) मेघवृष्टि पद्धति. सोनें, मोतीं, हिरे वगैरे धातु घेऊन सुवर्णकार आपल्या कलाकुसरीनें त्यांचे उत्तम नग बनवतो, तर दुसऱ्या पद्धतींत अमर्याद क्षेत्रावर मेघानें वर्षाव केल्यामुळ अखेरीस उत्तम पीक येतें. या दोन्हीं पद्धतींनीं आण्णांनीं झटून--झिजून काम केलें.

मुंबई येथें मूळ संस्था स्थापन झालेली. तेथें प्राथमिक व दुय्यम शाळा, उद्योग शाळा, विद्यार्थ्यांसाठीं वसतिगृहें, मोफत दवाखाना आणि उपासनालयें चालविणें हें ' सुवर्णकाराचें ' काम सुरू झालें. आणि मेघवृष्टिचें काम म्हणजे गांवोगांव व्याख्यानें देणें, परिषदा भरविणें आणि लोकमत तयार करणें. या दोन्हीं चाकांनीं अस्पृश्योद्धाराचा रथ आण्णांनीं चालू केला.

त्यांच्या संस्थेचें हेतु पुढील होते— ( १ ) शिक्षण प्रसार. ( २ ) नोकऱ्या मिळवून देणें. ( ३ ) सामाजिक अडचणींचें निवारण करणें. आणि ( ४ ) सार्वत्रिक धर्म, व्यक्तिगत शील आणि नागरिकता या गुणांचा प्रसार ह्या गरीब लोकांत करणें.

हे हेतु साध्य करण्यासाठीं निरनिराळे कार्यक्रम आखले जात. दर शनिवारीं व्याख्यानें आणि कीर्तनें होत. रविवारीं सकाळीं धार्मिक शिक्षणाचे वर्ग आणि सायंकाळीं उपासना होत. गांवांतील लोकांपासून जुने वा नवीन कपडे गोळा करून गरीब लोकांस वांटण्यांत येत. गरिब बायांसाठीं—विशेषतः कुमारी व विधवा यांच्यासाठीं—शिवण-कामाचा वर्ग सुरू करण्यांत आला. त्यांत तयार करण्यांत आलेले कपडेहि वांटण्यांत आले.

ह्या लोकांत स्वच्छतेच्या संवयी वाढाव्या म्हणून दर शनिवारीं शाळांतील मुलांना ‘ सदनांत ’ स्नान घालण्याची सोय करण्यांत आली. ह्या साध्या गोष्टीचा प्रथम प्रथम गरसमज होऊन बऱ्याच अडचणी येऊं लागल्या. चिकाटीनें आणि चतुराईनें काम चालवून या अडचणींतून आण्णांना पार व्हावें लागलें. अस्पृश्यतेप्रमाणेंच पोट–अस्पृश्यताहि नष्ट करण्यासाठीं त्यांना फार प्रयत्न करावे लागले.

या संस्थेच्या प्रचारिका अस्पृश्यांच्या घरोघर जात व त्यांना भारत, भागवत, रामायण यांतील कथा ऐकवीत. बाळंतपणांत मदत करण्यासाठीं या प्रचारिका अस्पृश्यांच्या वस्तींत जात. त्याचप्रमाणें आजाऱ्यांची शुश्रूषा व औषधोपचार करण्याची व्यवस्था त्यांनीं केली.

प्रथम प्रथम या प्रचारिका म्हणजे खिस्ती मिशनरी बाया आहेत, असा गैरसमज अस्पृश्य स्त्रियांचा होई आणि त्या त्यांना आपल्या चुलीला हात लावूं देत नसत. पण शुद्ध व निरपेक्ष सेवेच्या प्रकाशापुढें या गैरसमजांचा अंधार पार नाहींसा झाला.

अस्पृश्य मुलांच्या केवळ शिक्षणाची सोय शाळा उघडल्यानें लागत असे; पण त्या मुलांवर रात्रंदिवस शुभसंस्कार करतां यावेत म्हणून आण्णांनीं परळ येथें एक वसतिगृह १९०९ सालीं उघडलें. त्यांत शें. २५ पर्यंत स्पृश्य मुलेंहि घेण्यांत येत असत. त्यामुळें स्पृश्य व अस्पृश्य या दोन्हीं मुलांचा फायदा होई.

मोफत दवाखाना दोन वर्षे चालला होता. त्यांत एक हजारावर रोग्यांना उपचार करण्यात आले. त्यासाठीं खर्च फक्त २३२ रुपये झाला.

अशा नाना मार्गांनीं अस्पृश्य-समाजाची सेवा आण्णांनीं अखंड चालविली. ती पाहून लोक चकित होत. एके दिवशीं तर त्यांना एका श्रीमंत कार्यकर्त्यानें आपल्या घरीं बोलावलें आणि त्यांना प्रेमानें आलिंगन देऊन आणि डोळ्यांत आंसवें आणून विचारलें; “ हें अपूर्व मिशन काढण्याची कल्पना तुम्हांला कशी सुचली ? ह्या कामीं अस्पृश्य वर्गातल्या महिलांसाठीं तुम्हीं कांहीं तजवीज केली आहे काय ? ”

आण्णांनीं ‘ हो ’ म्हणून आपली सर्व योजना शेटजींना समजावून सांगितली. लगेंच दयारामजींनीं दरमहा १०० रुपयांची मदत देण्याचें आश्वासन दिलें. ती मदत ३ वर्षे चालू होती.

या संस्थेच्या कार्याचा विशेष हा कीं, कार्यकर्ते अस्पृश्य समाजांतच आपल्या कुटुंबासह रहात. त्यामुळें सहजच आपलेपणा उत्पन्न होई.

"पैसे मिळणें सोपें, पण माणसें मिळणें अवघड, निधि जमविणें हें माणसाचें काम, पण माणसें मिळणें ही ईश्वरी देणगी" असें आण्णा म्हणत. पण आण्णांचें दैव असें कीं, त्यांना सहकारीहि चांगले मिळाले. आई, वडील व बहिण ही घरची मंडळी तर होतीच. पण त्याशिवाय सय्यद अबदुल कादर हे मॅट्रिक झालेले शिक्षकहि, असलेली नोकरी सोडून, त्यांच्या कार्यांत सामील झाले. आणि असेच कितीतरी कार्यकर्ते. त्यामुळें आण्णांना राहून राहून वाटे, "आपल्या स्वीकृत कार्यांत परमेश्वराचा हात आहे." या भावनेमळें त्यांचा आत्मविश्वास वाढला आणि यशानें यशहि वाढत गेलें.

◆ ◆ ◆



## पैसा

तपाला सिद्धि, कष्टाला फळ, तसेंच सेवेला साहाय्य मिळत जातें. आण्णांची सेवा समाजपुरुषाच्या चरणीं रुजू झाली — मान्यता पावली — साहाय्यता लाभली. नाना दिशांनीं द्रव्याचे प्रवाह त्यांच्या संस्थेकडे वाहूं लागले. त्यासाठीं त्यांनीं विविध पद्धतशीर उपायहि योजले.

पहिला उपाय म्हणजे ' रुपी-फंड '. काळे यांची पैसा फंडाची कल्पना महाराष्ट्रानें पूर्वींच उचलून धरली होती. त्यांतून तळेगांवचा कांच-कारखाना निघाला. आण्णांनीं आपल्या ' रुपी-फंडा 'साठीं सहा कॅप्टन उभे केले आणि प्रत्येकाच्या हाताखालीं १०।१५ स्वयंसेवक दिले. आण्णा स्वतःतर कॅप्टन होतेच पण त्याशिवाय श्री. ठक्कर बाप्पा, सय्यद अबदुल कादर, सौ, लक्ष्मीबाई रानडे, इत्यादि कणखर कार्यकर्तेंहि त्यांचे कॅप्टन झालें होतें. त्यांच्या नेतृत्वानें ८० स्वयंसेवक

पैसे जमा करण्याचें काम करीत होते. सहा महिन्यांत १४७१ रुपये जमले.

जसा रुपी-फंड, तसाच ‘ तांदूळ-फंड ’. प्रत्येक गृहिणीनें रोज मूठभर तांदूळ टाकण्यासाठीं घरोघरीं धान्याच्या पिशव्या ठेवण्यांत आल्या. आचार्य विनोबांच्या “ सर्वोदय पात्राचा ” पूर्वजच हा फंड म्हणावयाचा ! “ प्रत्येक मूठभर तांदुळाच्या मागें एकेका स्त्रीचें मानवी हृदय असते. ” अशी आण्णांची भावना. याशिवाय ‘ कापडफंड’ व ‘ पेटी-फंड ’ हेहि त्यांनीं सुरूं केले. दुकानें, दवाखाने यांमध्यें मदतीसाठीं लाकडी धर्मार्थ पेट्या ठेवल्या. यामुळें समाजांतील निरनिराळ्या थरांमध्यें अस्पृश्योद्धाराचा विचार आपोआप पसरला जाई.



श्री. ठक्कर बाप्पा

या झाल्या आखीव योजना. पण त्याशिवाय स्वेच्छेनें, स्वयंस्फूर्तीनें मोठमोठ्या धनिकांनीं व सत्ताधाऱ्यांनीं आण्णांच्या कार्यास देणग्या दिल्या.

मुंबई राज्याचे गव्हर्नर — सर जॉर्ज क्लार्क, त्यांची कन्या मिस् व्हायोलेट. त्यांच्या गायनवादनाचा जलसा १९०८ च्या सप्टेंबरमध्यें

पुणें येथें करण्यांत आला. त्यांतून आण्णांच्या संस्थेला २४६७ रु. मिळाले. त्यांत ना. आगाखानांनीं ५०० रु. दिले होते. हें जसें बोहरी समाजाचे धर्मगुरु; तसेंच हम्पी येथील हिंदूंचे श्री. शंकराचार्य यांनींहि ३०० रु. ची देणगी दिली. महर्षि कर्वे यांनीं एका सभेंत १०० रु. ची देणगी दिली. अशा प्रसंगा-प्रसंगानें, थेंबा-थेंबानें, पैशाचें तळें भरत गेलें. त्यांतलाच एक गंमतीचा प्रसंग—

ता. १८ ऑक्टोबर १९०९—मंडळाचा वाढदिवस. मुंबईच्या टाऊन हॉलमध्यें जाहीर सभा भरली. अध्यक्षस्थानीं श्रीमंत सयाजीराव होते. त्यांनीं आपल्या भाषणांत मंडळाच्या कार्याचा मुक्तकंठानें गौरव केला आणि २००० रुपयांची देणगी दिली. त्यानंतर मंडळाचें उपाध्यक्ष श्री. सुखडवाला यांनीं ५००० रु.ची देणगी दिली. सभेंतील सारें वातावरण औदार्याच्या भावनेनें भरून गेलें. आणि स्त्रिया म्हटल्या कीं भावनाप्रधान. मोठमोठ्या कुटुंबांतील स्त्रियांनीं निधि जमविण्याची एक नवीनच युक्ती योजिली. त्यांनीं 'टाऊन हॉल'चे पुढचे तीन दरवाजे रोखले. "सारा जमाव जणुं काय कैद झाल्यासारखा देखावा दिसत होता." एकेका दरवाज्यांत दोघांदोघा भगिनींनीं आपली शाल पसरून प्रत्येक श्रोत्याला कांहींतरी देणगी देण्याचा आग्रह सुरू केला.

या वेढयांत मुंबईचें पोलिस कमिशनरहि सापडलें. त्यांनीं आपले खिसे चाचपले. पण त्यांत कांहींच सांपडलें नाहीं. पण बायका

...ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रम .......... वि: ..........
...... नों: दि: ..........

कसल्या वस्ताद ! त्यांनीं एक पेन्सिल व कागदाचा तुकडा त्यांच्या हातीं दिला व म्हटलें, "यावर आपल्या देणगीचा आंकडा लिहा आणि तो झोळींत टाका म्हणजे सुटका होईल. नाहीतर नाहीं." बिचारा पोलिस कमिशनर ! अबलांच्या प्रबळ सैन्यापुढें काय करणार ? त्यानें चिठ्ठी टाकली "ही माझी खंडणी घेऊन मला मुक्त करा." अशी विनवणी केली. दुसरें दिवशी त्यांनीं आपली देणगी संस्थेकडे पाठविली.



लॉर्ड हार्डिंग्ज

संस्थेच्या कार्याचा बोलबाला व्हॉइसरॉय लॉर्ड हार्डिंग्ज यांचे कानापर्यंत जाऊन पोहोंचला. लेडी हार्डिंग्ज यांनीं २००० रु. ची देणगी दिली. मुंबईच्या वाडिया ट्रस्टनें दरसाल ६००० रु. याप्रमाणें ३ वर्षांत १८००० रु. दिले. अशा लहान-मोठ्या देणग्या राव-रंकाकडून, नागरिक सत्ताधाऱ्यांकडून या संस्थेस मिळत गेल्या.

समाजाच्या सहानुभूतीचे लोट संस्थेकडे असे वळले, याचें कारण तिचें निरलस कार्य. १९०६ सालीं ही संस्था निघाली आणि पुढील सहा वर्षांत १४ ठिकाणीं २३ शाळा, ५५ शिक्षक ११०० मुले, ५ वसतिगृहें, इतर १२ संस्था व ५ प्रचारक असा संस्थेच्या कार्याचा पसारा वाढला. त्यासाठीं सुमारें २५ हजार रु. खर्च झाले.

त्यामुळें कितीहि पैसे मिळाले, तरी ते कार्याला अपुरेच टरले.

दर वर्षी नाताळांत कॉंग्रेसची बैठक जेथें जेथें भरे, तेथें तेथें आण्णा आपल्या 'एकेश्वरी धर्माची परिषद्' भरवीत. त्याचप्रमाणें या मंडळाच्याहि परिषदा तेथें भरविण्यास त्यांनीं सुरुवात केली. १९०७मध्यें सुरत, १९०८ मध्यें मद्रास, १९०९ मध्यें लाहोर, १९१० मध्यें अलाहाबाद, १९१२ मध्यें बांकीपूर व १९१३ मध्यें कराची येथें "निराश्रित साह्यकारी मंडळाच्या" परिषदा भरल्या. कराचीला तर **लाला लजपतराय** अध्यक्ष होते.



लाला लजपतराय

सहा वर्षें मंडळाचें कार्य झालें. अर्धे तप झालें. म्हणून १९१२ सालीं मंडळानें पुणें येथें एक मोठी परिषद् भरविली. ता. ५, ६, ७ ऑक्टोबर या तीन दिवशीं फर्ग्युसन कॉलेजमध्यें डॉ. भांडारकर यांच्या अध्यक्षतेखाली ही परिषद् भरली. १७ जिल्ह्यांतील ५४ गांवांतल्या १० जातींच्या २३० पाहुण्यांनीं परिषदेंत भाग घेतला. शिवाय पुण्यांतील शेंकडो नागरिक होते.

...६

स्पृश्यास्पृश्यांचें सहभोजन झालें. त्यांत ४०० माणसें जेवलीं. स्वागताध्यक्ष डॉ. मॅन, यांनींहि या प्रीतिभोजनांत भाग घेतला. आचारी ब्राह्मण होते व ते जुन्या मताचे होते. त्यांनीं ऐन वेळीं संप केला. पण ठल्याप्रमाणें १२ वाजतां सहभोजन पार पडलें. त्यानंतर जोराची पर्जन्यवृष्टि झाली, तरी पुढील सभेचें काम व्यवस्थितपणें सिद्धिस गेलें. व्याख्यानें, प्रवचनें, भजनें, कीर्तनें यांचा तीन दिवस पाऊस पडला. लष्करांत स्त्रियांची सभा श्री. रमाबाईसाहेब रानडे यांच्या अध्यक्षतेखालीं भरली. तीत ब्राह्मण व महार महिलांचीं भाषणें झालीं. पुणें येथील इमारतीसाठीं या परिषदेंतून कांहीं पैसा जमेल अशी आण्णांची अपेक्षा होती, पण प्रत्यक्ष पदरांत पडली तूट–२६० रुपयांची !

पण ही तूट तर कशी म्हणावी ? कार्याची, प्रचाराची, सेवेची, लयलूट झाली. कोणत्याहि कार्याला फळ येतें, पण थोड्या विलंबानें.

" सदासर्वदा राम सन्निध आहे । कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे ॥ असाच अनुभव खऱ्या कार्यकर्त्यांना येतो. पुण्यांतील परिषदेचा अहवाल दूर दूर गेला. इंदूरचे महाराज श्रीमंत तुकोजीराव होळकर यांनीं तो वाचला. त्यांना अचंबा वाटला–आनंद वाटला. मुंबईस गेल्यावर त्यांनीं आण्णांना ताजमहाल हॉटेलमध्यें बोलावून घेतलें, त्यांच्या कामाची तारीफ केली आणि २०००० रु. चा चेक त्यांच्या हातीं दिला. आण्णांना वाटलें, " अनंत हस्तें कमलावरानें । देतां किती घेशिल दो करानें । "

पावसाळ्यांत जशा पावसाच्या सरीवर सरी येतात; आणि नदीला पुरामागून पूर येतात; तसें द्रव्यसाहाय्य आण्णांच्या 'मंडळा'ला

एकसारखें होत गेलें. वाडिया ट्रस्टचें १८००० रु., तुकोजीरावांचे २०००० रु. या देणग्या मोठ्या तर खऱ्याच, पण त्यावर कळस चढविला मुंबई सरकारनें, त्यांनीं ८७००० रु. दिलें. त्यामुळें पुणें येथें "अहिल्याश्रमा"ची इमारत बांधण्यांत आली.

सरकारचें, सरकारी अधिकाऱ्यांचें व नेमस्त नेत्यांचें साहाय्य आण्णा सतत घेत होते; तरी त्यांची स्वतंत्र बुद्धि कायम होती—त्यांची देशभक्ति निर्लेप होती. १९०७ सालीं, लोकमान्य टिळकांनीं सुरतेची काँग्रेस उधळून लावली आणि नेमस्तांचा पराभव केला. पुढील वर्षीं सरकारनें त्यांच्यावर खटला भरून त्यांना सहा वर्षांची शिक्षा ठोठावली. सारा देश दुःखांत बुडाला! एके रविवारीं साप्ताहिक उपासना चालवितांना आण्णांनीं लोकमान्यांसाठीं प्रार्थना केली, "प्रभो, जनतेच्या या पुढाऱ्याला आयुरारोग्य लाभो, त्याच्या शरिराला विश्रांति आणि मनाला शांति मिळो." ही प्रार्थना करतांना आण्णा गहिंवरले होते.


लोकमान्य टिळक

एका थोर देशभक्ताबद्दल शुद्ध आदरभाव! पण तोहि कांहीं नेमस्त नेत्यांना रुचला नाहीं. ते प्रार्थना-समाजाचेहि नेते, त्यांनीं आण्णांना आपली नापसंती कळविली. तेव्हां आण्णांनीं स्पष्ट शब्दांनीं निर्वाणीचें उत्तर त्यांना दिले, "माझें कर्तव्य करण्यांत मीं कच खाल्ली,

तर मीं स्वत:शींच अपात्र ठरेन. आपला विश्वास असेल तर मला या जागेवर ठेवा; नाहींतर नको. पण माझ्या कामांत स्वत: मला आणि माझ्या ईश्वराला मला जबाबदार राहूं द्या."

पुढें १९१० नोव्हेंबरांत प्रार्थना-समाजाचा व आण्णांचा प्रचारक या नात्यानें संबंध सुटला. त्यामुळें आण्णांना पूर्ण मानसिक स्वातंत्र्य मिळालें; पण होतें नव्हतें तें आर्थिक स्वास्थ्य गेलें. समाजाकडून मिळणारें अपुरें वेतनहि मिळेनासें झालें; मग प्रपंच चालवावयाचा कसा? तेव्हां एका मित्राच्या रूपानें देव उभा राहिला आणि त्यानें अण्णांच्या योगक्षेमाची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली. त्या मित्राचें नांव द्वा. गो. वैद्य. खाजगी रीतीनें वर्गणी जमवून त्यांनीं दोन वर्षें आण्णांच्या संसाराचा भार वाहिला. त्यामुळें आण्णा निर्वेधपणें आपल्या मंडळाचें कार्य जोरानें करूं लागलें.


डॉ. बेझंट

कॉंग्रेसमध्यें अस्पृश्यता-निवारणाचा ठराव आणावा म्हणजे त्या राष्ट्रीय संस्थेच्या मुखानें सर्व राष्ट्राला या कार्याचा संदेश कळेल असा आण्णासाहेबांचा विचार, त्यासाठीं सतत १० वर्षें ते प्रयत्न करीत होते. त्याला जोर चढाला १९१७ सालीं. त्या वर्षी कलकत्ता येथें कॉंग्रेसचें अधिवेशन भरलें. डॉ. बेझंट या अध्यक्ष होत्या.

त्यांनीं आण्णांच्या मंडळाचें कार्य मुंबईस प्रत्यक्ष पाहिलें होतें. त्यामुळें आण्णांच्या प्रयत्नाला यश आले व कलकत्ता काँग्रेसनें सर्वानुमतें असा ठराव मंजूर केला कीं--

" ही राष्ट्रीय सभा हिंदुस्थानांतील सर्व लोकांस जाहीर विनंती करते कीं, अस्पृश्य वर्गावर आजपर्यंत जो अनन्वित जुलुम होत आहे, तो तावडतोब बंद करण्यांत यावा."

अशीच दुसरी महत्त्वाची घटना पुढील वर्षीं घडून आली. ता. २३ मार्च १९१८ रोजीं मुंबई येथें अ. भा. अस्पृश्यतानिवारक परिषद आण्णांनीं भरविली. ती सर्व दृष्टींनीं टोलेजंग झाली. अध्यक्ष होते श्रीमंत सयाजीराव आणि स्वागताध्यक्ष होते न्या. चंदावरकर. ५।७ हजार लोक परिषदेला जमले होते. बॅ. जयकर, भुलाभाई, देसाई, बिपिनचंद्र पाल, इत्यादि पुढाऱ्यांनीं त्यांत भाग घेतला होता. लो. टिळकांनीं जोराचें भाषण केलें आणि उच्च स्वरानें असे उद्गार काढले, " अस्पृश्यता प्रत्यक्ष परमेश्वरच जर मान्य करूं लागला तर मी त्याला परमेश्वर म्हणून मुळींच मानणार नाहीं ! " हें तेजस्वी विचार कानांवर पडतांच परिषदेंतील त्या हजारों श्रोत्यांनीं टाळ्यांचा एवढा प्रचंड कडकडाट केला कीं, त्यामुळें सारा मंडप कोसळून पडतो कीं काय, असें आण्णांना वाटूं लागलें.


बॅ. जयकर

याच्या आधीं लोणावळें येथें " जिल्हा राजकीय परिषद " भरली असतां अस्पृश्यता निवारणाचा ठराव लो. टिळकांनीं आग्रहानें विरोध बाजूस सारून, मंजूर करून घेतला होता. मुंबईच्या परिषदेंत, ' शाळा, दवाखाने, पाणवठें, देवळें इत्यादि सार्वजनिक ठिकाणीं ' अस्पृश्यांना मोकळीक असावी असा ठराव तर झालाच, पण त्याशिवाय निरनिराळ्या प्रांतांतील ३०० ठळक ठळक पुढाऱ्यांनीं एका प्रतिज्ञा-पत्रकावर सह्या केल्या. तें प्रतिज्ञा-पत्रक असें—

" मीं खालीं सही करणार ठरावांतल्या अटी स्वत: अक्षरश: पाळीन आणि मीं स्वत: हरप्रयत्न करून दुसऱ्याकडूनहि त्या पाळल्या जातील असें प्रयत्न सतत करीन. "

अस्पृश्यता ही एक दुष्ट रुढि, पण अशा दुसऱ्या किती तरी अनिष्ट चालीरीति आपल्या समाजांत आहेत. त्याहि दूर करण्याकडे आण्णा सवड होईल तेव्हां लक्ष देत. अस्पृश्यता—निवारण हें तर त्यांचें जीवितकार्य. त्यासाठीं ते तन-मन-धनानें रात्रं-दिवस झटत. पण समाजाचीं इतर व्यंगें नष्ट करण्याचाहि प्रयत्न ते करीत. मुरळीची चाल अशीच. तिच्या विरुद्ध त्यांनी लोकमत जागृत केलें. तसाच शिमग्यांतील बीभत्सपणा. होळीचे वेळीं अपशब्द व अत्याचार यांना ऊत येत असे. त्याविरुद्ध आण्णांनीं मोहीम सुरू केली.

एका शिमग्याचें वेळीं ते नागपूरला होते. त्यांनीं होलिका-संमेलनाची जाहीर सभा बोलाविली. सर मोरोपंत जोशी अध्यक्ष होते. सभेस गर्दी बरीच जमली होती. सभा संपल्यावर आण्णा सायकलवर बसून मंडळाच्या जागेकडे निघाले.

तो दिवस रंगपंचमीचा. भर बाजारांत, ऐन दुपारीं, रंगाची दंगल चालली होती. बैलगाड्यांवर रंगांचे हांडे भरून येणाऱ्या-जाणाऱ्यावर पिचकाऱ्या मारल्या जात होत्या. आण्णांची सायकल बाजाराच्या मुख्य वेशीपाशीं आली. "होळीच्या सणाविरुद्ध मोहीम करणारा हाच सुधारक" हें ओळखून तेथल्या रंगेल लोकांनीं रंगाच्या बादल्या-मागून बादल्या आण्णांच्या अंगावर ओतल्या. त्यांना त्यांनीं सायकल-वरून खालींदेखील उतरूं दिलें नाहीं. चौघां घटिंगणांनीं त्यांना सायकलवरच रंग-स्नान घातलें. आणि त्याबरोबर चालू होती शिमग्यांतील शिव्यांची बरसात !

पण आण्णा हाडाचे मिशनरी. "इतक्या थाटानें लग्नांतसुद्धां माझें अभ्यंगस्नान झालें नव्हतें." असें ते हांसत हांसत म्हणाले.

दुसरे दिवशीं कमिशनरची भेट घेतली असतां त्यांनीं आपल्या या "स्वागत–समारंभाची" हकीकत शांत चित्तानें निवेदन केली. तेव्हां कमिशनरसाहेब पोट धरधरून हांसले.

◆ ◆ ◆



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ........................
क्रमांक ........................ नों दि: ........................

# जात

मुरळी किंवा होळी यापेक्षां दुसरा एक मोठा प्रश्न आण्णांच्या पुढें यावेळीं उभा राहिला. तो म्हणजे ब्राम्हणेतर चळवळीचा. परक्या सरकारच्या भेदनीतीमुळें हिंदु व मुसलमान यांच्यामध्यें जसें तंटे पेटले, तसेंच ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांचेंमध्येंहि झगडे निर्माण झाले. या बाबतींत आण्णांची भूमिका स्वच्छ होती. ब्राह्मण नसलेल्या सर्व जातींना एकत्र करण्यासाठीं ‘ ब्राह्मणेतर पक्ष ’ निर्माण होऊं लागला. सर्व राष्ट्राची जागृति होत असतां नवीन जातीय, संकुचित पक्ष उभारणें त्यांना इष्ट वाटलें नाहीं. राष्ट्र-हिताच्या व्यापक दृष्टीनें विचार करून त्यांनीं आपलें मत असें जाहीर केलें कीं,

“ नवीन होऊं घातलेला ब्राह्मणेतर वाद ऐक्याला फार घातुक होईल. योग्य रीतीनें तो चालविला नाहीं, तर दोघांचें भांडण व तिसऱ्याचा लाभ असा प्रकार होईल. महाराष्ट्रांत मराठा समाज हा

बहुसंख्य असून महाराष्ट्राच्या पाठीचा कणा असल्यासारखा आश्रयभूत आहे. तेव्हां ह्या समाजाची जागृति तर एका बाजूनें व्हावीच; पण त्या जागृतीमुळें महाराष्ट्रांत फूट न पडावी. उलट ब्राह्मणांपासून तो अस्पृश्यांपर्यंत हें जागृतीचें व ऐक्याचें लोण खालीं उतरावें."

मराठे बांधवांना जागें करावें आणि त्यांच्या कार्याची गाडी राष्ट्रीयतेच्या रुळावरून न्यावी, या हेतूनें "मराठा राष्ट्रीय संघ" या नांवाची संस्था त्यांनीं स्थापन केली. त्या संस्थेतर्फे पहिली जाहीर सभा पुणें येथें शनिवारवाड्यापुढें ता. ८ नोव्हेंबर १९१७ रोजीं भरली. अध्यक्षस्थानीं आण्णा होतें. सभेत १०००० लोक जमलें होतें. स्वराज्याच्या ठरावावर लोकमान्य टिळकांचें भाषण झालें. राष्ट्रीय भावनेला भरती आली.

जातीयतेचा पूर्ण तिटकारा अण्णांना होता. त्यांची राष्ट्रीय भावना बावनकशी होती. तिची कसोटी १९२० सालीं लागली. त्यावेळीं देशांत निवडणूक होणार होती. मराठा समाजांतील दोन्हीं पक्षांनीं आण्णांना उभे करण्याचें ठरविलें, पण त्यांनीं निक्षून सांगितलें, "मीं राखीव जागेसाठीं उभा राहणार नाहीं. त्यांतील जातीय तत्त्वाच्या विरुद्ध मीं आहें."

"बहुजन पक्ष" या व्यापक भूमिकेवरून आण्णा निवडणुकीस उभे राहिले. किसान, कामगार, दुकानदार, शिक्षक, शिपाई, कारागीर, अस्पृश्य, स्त्रिया—अशा बहुजनसमाजाचें कल्याण करण्यासाठीं आपला पक्ष प्रयत्न करील असा जाहीरनामा त्यांनीं काढला. "बहुजनसमाजास

जागें करून त्याला स्वतःच्या पायावर उभें करण्याचें कठीण काम" आण्णांनीं आपल्या शिरावर घेतलें. त्यांना कोल्हापूरच्या शाहू छत्रपतींनीं पाठिंबा दिला. इतरहि मित्रांनीं त्यांच्याकरितां खूप खटपट केली, पण त्यांना निवडणुकींत अपयश आलें. परंतु त्याची त्यांना खंत वाटली नाहीं. कारण त्यांनीं निवडणुकींतील यशासाठीं आपला राष्ट्रीयत्वाचा बाणा सोडला नव्हता.


शाहू छत्रपती

त्याच वर्षी पुणें व नगर या जिल्ह्यांत दुष्काळानें आ पसरला. तेव्हां त्यांच्या मदतीसाठीं आण्णांनीं खूप खटपट केली.

दारूबंदीच्या चळवळींत त्यांनीं गुत्त्यावर निरोधन केलें आणि खूप व्याख्यानें दिलीं.

१९१९ सालीं पुणें नगरपालिकेनें प्राथमिक शिक्षण सक्तीचें करण्याचें ठरविलें. त्या योजनेचा फायदा मुलांप्रमाणें मुलींनाहि मिळावा असा आग्रह आण्णांनीं धरला आणि त्यासाठीं सभा-मिरवणुका काढल्या.

दुफळी आमच्या पांचवीस पूजलेली. त्यामुळें आण्णांना पूर्वी प्रार्थना-समाज सोडावा लागला आणि १९२३ सालीं त्यांनीं स्वतः

काढलेलें व वाढविलेलें "निराश्रित साह्यकारी मंडळ" हि सोडावें लागलें. मतभेद व वादविवाद, कलह व कटकटी यांत वेळेचा व शक्तीचा अपव्यय होऊं नये अशी त्यांची इच्छा. पण विरोधकांना त्याचें काय? त्यांनीं हायकोर्टांत आण्णांवर फिर्याद केली. हायकोर्टानें आण्णांच्या बाजूनें निकाल दिला व त्यांना त्यांच्या मंडळाचें ट्रस्टी ठरविलें. मंडळाशीं बाकी कांहीं संबंध राहिले नाहींत. आपल्या पोटच्या मुलाचा विरह सहन करण्यासारखा तो दुखःदायक प्रसंग! पण तोहि आण्णांनीं शांतपणें सहन केला.

सुख-दुःखाचे उलटसुलट झोकें आण्णा घेत होतें. १९३४ सालीं मुंबई येथील ४१ संस्थांनीं त्यांना मोठ्या सन्मानानें जाहीर मानपत्र दिलें. त्या वेळीं उत्तर देतांना ते म्हणालें, "हिंदुस्थानांतला अस्पृश्यते-सारखा एक मोठा अन्याय, स्वस्थ बसून चालूं दिल्याबद्दल, सर्व जग अपराधी आहे; म्हणून या कामांत सर्व जगानें भाग घेतला पाहिजे."

याच तळमळीनें त्यांनीं वायकोम सत्याग्रहांत भाग घेतला. त्रावणकोर संस्थानांतील हे एक छोटेंसें गांव. पण तेथें अस्पृश्यतेचें भूत फार कडक. अस्पृश्यांना देवळाकडे जाण्याची बंदी असे. ती मोडून काढण्यासाठीं तेथील अस्पृश्यांनीं १९२४ सालीं सत्याग्रह सुरू केला. देशांतील शेंकडों लोक तेथें जमले होतें. आण्णांनींहि त्या सत्याग्रहांत भाग घेतला.

त्या सुमारास तें मंगलोर येथें ब्राह्मसमाजाचें कार्य करीत होते. मद्रास इलाख्याकडील हा शेवटचा कानडी जिल्हा. आण्णांना कानडी चांगलें येत होते. त्यामुळें त्यांच्या कार्याचा जम तेथें चांगला बसला.

पण तेथेंहि विरोधाचें भूत त्यांच्या पाठीमागें लागलेंच. आणि त्याचें कारण काय? तर—

गांधी–टोपी! त्या वेळीं आण्णा आपल्या डोक्यावर खादीची पांढरी टोपी घालीत होते. त्या टोपीवर परक्या सरकारचा दांत! त्यामुळें सर्वसामान्य लोक ही टोपी घालण्यास भीत. त्यांनीं तक्रार केली. तेव्हां आण्णांनीं टोपी घालण्याचेंच सोडलें. ते यापुढें डोक्यावर कांहींच न घालतां हिंडूं लागले.

टोपी टाकली तरी दुही मिटली नाहीं. म्हणून १९२५ च्या एप्रिलमध्यें आण्णांनीं मंगलोर सोडलें व पुण्यांत कायमचें ठाणें दिलें.

आण्णांची ही स्वतंत्र वृत्ति व राष्ट्रभक्ती १९३० सालीं प्रखरपणें प्रगट झाली. त्या वर्षीं कायदे भंगाची चळवळ देशभर पेरली होती. त्यासाठीं आण्णांनीं पुणें जिल्ह्यांत व्याख्यानांचा दौरा काढला. त्याचें फळ सरकारनें त्यांना तत्काळ दिलें. तें म्हणजे ता. १८ मे रोजीं त्यांना पकडण्यांत आलें व ६ महिने सक्त मजुरीची शिक्षा ठोठावण्यांत आली. येरवड्याच्या तुरुंगांत तरट आंथरुन व कांबळे पांघरून ते निजूं लागलें. त्या बंदी-वासांतून त्यांची सुटका ता. १४ ऑक्टोबर रोजीं झाली.

कारागृहांतून राजगृहांत जाण्याचा योग आण्णांना आला. कारण त्यांनीं केलेल्या समाजसेवेचें चीज म्हणून बडोदें सरकारनें त्यांना १००० रुपयांचें पारितोषिक दिलें आणि एक वर्षभर दरमहा १०० रु. दिले. ता. १८ जानेवारी १९३३ रोजीं त्यांनीं हें पारितोषिक बडोदें येथें जाऊन घेतलें आणि तीन व्याख्यानें दिलीं.

आण्णांच्या जीवनांतील साफल्याचा हा क्षण होता. ◆◆◆



# आठ

मान हें एक रत्न आहे. त्याला जितके पैलू पाडावेत, तितके त्याचें तेज वाढतें.

आण्णासाहेबांच्या मनावर मूळ संस्कार धार्मिक होतें. म्हणून ते प्रार्थना–समाजाकडे वळले आणि विश्वबंधुत्वाचा, एकेश्वरी वादाचा प्रचार करूं लागले. जात किंवा धर्म यांच्या भेदाला त्यांच्या चित्तांत स्थान नव्हतें.



हरिभाऊ आपटे

प्रि. आगरकर, हरिभाऊ आपटे यांच्या सुधारणावादाचें संस्कार आण्णांच्या मनावर. तरुणपणीं झाले आणि म्हणून त्यांनीं अस्पृश्यता-निवारण हें आपलें जीवित कार्य मानलें.

धार्मिक व सामाजिक सुधारणामध्यें अग्रेसर राहूनहि ते राजकारणांत मागें पडले नाहींत. कारण सर्वांगीण सुधारणावाद त्यांना हवा होता. म्हणून कायदेभंगाच्या राजकीय आंदोलनांत भाग घेऊन त्यांनीं देह-दंडहि सोसला.

त्यांच्या बुद्धीचा पिंड संशोधकाचा होता. दार्जिलिंगपासून मलबारपर्यंत त्यांनीं प्रवास केलेला होता. ब्रह्मदेशांतील समाजस्थितीचेंहि साक्षात् अवलोकन त्यांनीं केलें होतें. भारतीय समाजाच्या "तळल्या-वरल्या" थरांत तें संचार करून आलेले होते आणि त्यांना अनेक भाषा चांगल्या येत होत्या. त्यामुळें त्यांचें संशोधन सखोल व समतोल असे. एकांगीपणा किंवा कडवटपणा त्यांच्या वाऱ्यासहि उभा रहात नसे.
साहित्य-सेवेचीहि त्यांना आवड होती. भागवत-धर्माचा विकास, मराठ्यांची पूर्वपीठिका, महाराष्ट्राच्या उत्कर्षाचा मार्ग, तौलनिक भाषा शास्त्र, तत्त्वज्ञान, आणि समाज-शास्त्र, कानडी मराठी वाद, इत्यादि विषयांवरील त्यांचे लेख हें त्यांच्या विद्वत्तेचें साक्षीदार होत. कोंकणी ही मराठीचीच उपभाषा आहे असें त्यांचें मत होतें.

विद्वत्तेप्रमाणें रसीकताही त्यांचें अंगीं असे. धर्मप्रसारासाठीं कीर्तन करतांना केव्हां केव्हां ते स्वतःचीं पदें म्हणत. एका पदांत त्यांनीं तुकाराम महाराजांची पत्नी जिजाऊ हिचें वर्णन विनोदी शब्दांनीं केलें आणि म्हटलें---

तुकया आम्हां सर्वां संत। परि तुकयाला अवली संत ॥
आम्हि तुकोब्बा सदैव वंदूं। परि अवलाई कधीं न निंदूं ॥

जिजाऊ प्रमाणेंच जिजामातेचेंहि आख्यान त्यांनीं आपल्या एका कीर्तनांत लावलें होतें. त्यासाठीं त्यांनीं स्वत: एक फटका रचला होता.

## नऊ लाखांचा फटका माझा घटकाभर लाविल चटका

अशा तऱ्हेचा चटका, आपल्या लेखणीनें, वाणीनें व करणीनें, महाराष्ट्रास लावणारे कर्मवीर आण्णासाहेब शिंदे यांच्या स्वभावाचे नाना पैलू अत्यंत तेजस्वी होते.

तो काळ गोऱ्या लोकांना भिण्याचा होता. गोरे इंग्रज हे भारताचे राज्यकर्ते होते. त्यामुळें एखाद्या फाटक्या सोजेरालाहि हिंदी लोक थरथरा कांपत. न्या. रानडेसारख्यांनाहि गोऱ्यांच्या शिरजोरीचा कडू अनुभव रेल्वे–प्रवासांत आला होता. तसाच तो आण्णांनाहि आला. १९०८ सालीं मद्रास येथें भरणाऱ्या ‘एकेश्वरी धर्मपरिषदे’ला ते नाताळांत निघाले. तेव्हां त्यांची प्रकृति बरी नव्हती, म्हणून बंगलोर-पर्यंत त्यांनीं सेकंड क्लासनें प्रवास केला.

गुंटकल स्टेशन आलें. तार करण्यासाठीं आण्णा गाडींतून खालीं उतरले. तार करून ते परत आपल्या डब्याकडे आले, तों त्या डब्यांत तीन आडदांड युरोपियन बसलेले व त्यांच्या भीतीनें बाकीचे सारे हिंदी उतारू डब्यांतून बाहेर गेलेले. पण आण्णा निर्भय. इंग्लंडांत जाऊन आलेले. ते आपल्या जागेवर धिटाईनें जाऊन बसले. तें पाहून, उतरलेले हिंदी उतारू डब्यांतच परत आले.

पांच वर्षांनीं असाच प्रकार पुन: घडला. १९१३ सालीं नाताळांत ‘एकेश्वरी परिषद’ कराचीस भरली. तिचे अध्यक्ष होते

अमेरिकेचे जे. टी. संडरलंड. त्यांची उतरण्याची सोय एका युरोपियन हॉटेलांत करण्यांत आली होती. त्यांना भेटण्यास आण्णा एकदां गेले असतां हॉटेलाच्या मॅनेजरानें त्यांना मनाई केली. गोऱ्यांच्या हॉटेलांत 'काळा आदमी' कसा? असें मॅनेजराला वाटलें. पण हें राष्ट्र 'काळ्या आदमी'चेंच आहे हें तो विसरला. संडरलंडची भेट झाल्यावर त्यांना आण्णांनीं बजावलें, "पुन: असा प्रकार घडला, तर आपल्याला येथून हलावें लागेल आणि आम्हीं व्यवस्था करूं तेथें रहावें लागेल. आमच्याप्रमाणेंच आपणहि येथें परतंत्र आहां." त्या पारतंत्र्याच्या काळांत आण्णांनीं असा स्वाभिमान, असा बाणेदारपणा कैक वेळां दाखविला.

काठेवाडांत दौरा करीत असतां आण्णांना आढळलें कीं, रेल्वेवर अस्पृश्यासाठीं निराळा डबा आहे व त्यावर 'धेडोने माटे' असें लिहिलेलें आहे. त्यांत अस्पृश्य स्त्री-पुरुषांची चिक्कार गर्दी होती. इतक्यांत एक पोलीस पार्टी आली. तिला गार्डीत जागा नव्हती. त्या पोलिसांनीं अस्पृश्य उतारूंना धक्के मारीत डब्यांतून खालीं उतरविले. पोलिसांना जागा मिळाली, पण त्या अस्पृश्यांना? त्या बिचाऱ्यांची दाद कोण घेणार?

आण्णा आपल्या डब्यांतून उतरले व गार्डाकडे गेले. 'हा अन्याय दूर करा नाहीं तर तुमच्या वरिष्ठाला मी तार करीन' अशी धमकी आण्णांनीं गार्डाला दिली. ती मात्रा लागू पडली. गार्डानें पोलिसांची हकालपट्टी केली व अस्पृश्यांना त्यांचें हक्काचें स्थान दिलें! तो गार्ड स्वत: पूर्वी धेड होता व पुढें ख्रिश्चन झाला होता.

हा बाणेदारपणाचा हाच बाणा आण्णांनीं स्वकीयांपुढेंहि मिरविला होता. श्रीमंत सयाजीरावांचे त्यांचेवर केवढें उपकार, पण त्यांनाहि तें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१३८५०

प्रसंगविशेषीं विरोध करीत. लो. टिळकांच्या शिक्षेनंतर डॉ. भांडारकर, न्या. चंदावरकर इत्यादि नेमस्त नेत्यांनी भीक न घालतां आण्णांनीं लोकमान्यांच्या आरोग्यासाठीं प्रार्थना केली. आणि खुद्द लोकमान्यांनीं अस्पृश्यता-निवारणाच्या प्रतिज्ञा-पत्रकावर सही केली नाहीं म्हणून त्यांचेवरहि टीका करण्यास ते कचरले नाहींत. तसेंच स्त्री-शिक्षणाच्या सभेंत उघडविरोध करण्यास डरले नाहींत.

'निःस्पहस्य तृणं जगत्' अशी त्यांची वृत्ति असे. मुंबईत १४ संस्थांनीं १९३४ सालीं त्यांना मानपत्र दिलें, तेव्हां त्यांनीं जें उत्तर दिलें, तें या वृत्तीनेंच. "मानपत्राबद्दल मी तुमचा आभारी आहें, पण त्यामुळें मी तुमचा मिंधा रहाणार नाहीं. जेथें माझें तुमच्याशीं जमणार नाहीं, तेथें मी तुमच्याविरुद्ध गेल्याशिवाय रहाणार नाहीं." असे सडेतोड उद्गार त्यांनीं काढले.



विठ्ठल रामजी शिंदे

स्वभाषा, स्वधर्म व स्वदेश यांची सेवा सतत चाळीस वर्षे केल्यावर व आयुष्याची सत्तरी ओलांडल्यावर आण्णासाहेबांनीं ता. २ जानेवारी १९४४ रोजीं पुणे येथें आपला श्रांत देह ठेवला; आणि आपला निर्मल लौकिक महाराष्ट्रांत कायमचा ठेवला.

◆◆◆

अनुक्रम
क्रमांक
दि:
नों. दि

# जीवन-पट

१८७३ — २३ एप्रिल जन्म.

१८८५ — वयाच्या १२ व्या वर्षीं इंग्रजी शिक्षणास सुरुवात.

१८९३ — महाविद्यालयीन शिक्षणासाठीं पुण्यास आगमन.

१८९५ — पुणें येथें भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनांत स्वयंसेवक म्हणून काम.

१८९८ — बी. ए. उत्तीर्ण.

१८९९ — २९ मे, प्रार्थना समाजांत पहिलें पाऊल.

१९०१ — २१ सप्टेंबर धर्मांच्या तौलनिक अभ्यासासाठीं इंग्लंडला रवाना.

१९०७-१० — "निराश्रित साह्यकारी मंडळाच्या परिषदा" सुरत, मद्रास, लाहोर व अलाहाबादे येथें भरविल्या.

१९१० — नोव्हेंबर – प्रार्थना समाजाचा प्रचारक म्हणून संबंध सुटला.

१९१७ — पुणें येथें भरलेल्या "मराठा राष्ट्रीय संघाच्या" पहिल्या सभेचें अध्यक्ष.

१९१९ — पुणें नगरपालिकेनें मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचें केलें. मुलींनाहि तें असावे म्हणून आग्रह धरला.

१९२३ — निराश्रित साह्यकारी मंडळाचा संबंध सुटला.

१९२४ — वायकोम सत्याग्रहांत भाग.

१९३० — १८ मे कायदेभंगाच्या चळवळींत भाग घेतल्याबद्दल सहा महिने सक्त मजुरी.

१९३३ — १८ जानेवारी, बडोदें सरकारनें समाज सेवेबद्दल रु. १००० चें पारितोषिक दिलें.

१९३४ — मुंबईत ४७ संस्थांनी सन्मानानें जाहीर मानपत्र दिले.

१९४४ — २ जानेवारी, आपला श्रांत देह पुण्यांत ठेवला.

REFBK-0013820